// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

वर्ष : १ अंक : १०

# साद दे, साथ घे

डिसेंबर २०१९

# देश सुत्र

पुण्यातील गहुंजे बलात्कार, खून प्रकरणात राज्य महिला आयोग सर्वोच्च न्यायालयात

उन्नाव आमदार कुलदीप सेंगरला जन्मठेप




महाराष्ट्र राज्य महिला आयोग


# अंतरंग...


## राज्यातील महिला होताहेत डिजिटल साक्षर

१७

## ‘एनआरआय’शी विवाह : समस्या व समाधान

महिलांविषयक कायदे विषयक जनजागृतीसाठी राज्य महिला आयोगाने ‘विधिलिखित’ (भाग २) ही पुस्तक मालिका प्रकाशित केली आहे. त्या मालिकेतील ‘एनआरआय’ विवाहविषयक समस्या, समाधान व कायदे यांची माहिती...




२३



## घरगुती औषधे : कारले

कारले कडू असले तरी अनेक असाध्य रोगांवर औषध म्हणून याचा वापर चांगला होतो. जास्त करून मधुमेहावरील औषध असा याचा उल्लेख केला जातो. कारले हे उष्ण, कडू असले तरी पित्त वाढवत नाही.

३३

## जिम्नॅस्टिकमधील नवे आशास्थान

रिदमीक जिम्नॅस्टिक प्रकारात तेलंगणाची मेघना रेड्डी दीपाचा वारसा पुढे नेण्यासाठी सज्ज झाली आहे. २०२० साली जपानमध्ये होणाऱ्या ‘टोकियो ऑलिंपिक’ मध्ये भारताला दीपा बरोबरच मेघनाकडूनही पदकाची आशा निर्माण झाली आहे.



३५

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //
साद
दे, साथ घे

RNI No. MAHMAR49593

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
फोन : ०२२-२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई-१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**'सुहिता' हेल्पलाइन**
**७४७७७२२४२४**

**स्वागत मूल्य : ₹ १०**
**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**



# माणुसकीला काळीमा

गेल्या पंधरा दिवसांत घडलेल्या दोन घटनांनी देश अगदी सुन्न झाला. हैदराबादमध्ये एका पशुवैद्यकीय व्यावसायिक तरुणीवर बलात्कार करून तिला जाळण्यात आले. दुसरीकडे, उत्तर प्रदेशातील उन्नाव या ठिकाणी गेल्या वर्षी घडलेल्या बलात्कार प्रकरणातील पीडितेला जाळण्यात आले. समाजमन बधीर करणाऱ्या या घटना आहेत. हैदराबादमध्ये पोलिसांनी चारही आरोपींना चकमकीत गोळ्या घालून मारले. याही घटनेवर देशभरातून संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. सामान्य जनतेने पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव केला. काही विरोधी सूरही उमटले. आपल्या देशाची लोकशाही समाजव्यवस्था, निष्पक्ष न्याययंत्रणा आणि एखाद्या घटनेचे दूरगामी परिणाम असा साधकबाधक विचार केला असता पोलिसांच्या कृत्याचे समर्थन करता येणार नाही, परंतु हे कृत्य करण्यास पोलिसांना का भाग पडले आणि एरवी ज्या कृत्याची समाजातून निंदा झाली असती, त्याचे सामान्य नागरिकांनी इतके उत्स्फूर्त स्वागत का केले, याचाही विचार आपण करणे गरजेचे आहे.

बलात्काराच्या घटनांमध्ये न्यायदानास विलंब होणे, पुराव्यांअभावी आरोपी निर्दोष सुटणे अशा घटना पूर्वी घडलेल्या आहेत. दिल्लीत २०१२ मध्ये घडलेल्या निर्भया प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा होऊनही अजूनही त्यांना फासावर चढविले गेले नाही. 'जस्टिस डीलेड, इज जस्टिस डिनाइड,' अशी म्हण इंग्रजीत आहे. न्यायदानाला इतका विलंब होणार असेल, तर सामान्य नागरिकांचा या व्यवस्थेवरील विश्वास कमी होतो. हे लक्षात घेता, बलात्काराच्या खटल्यांची निर्गत कालबद्ध पद्धतीने होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने यासाठी आवश्यक पावले उचलली आहेत. जलदगती न्यायालयांची संख्या वाढविण्यात येत आहे. बाललैंगिक अत्याचारांचे खटले दोन महिन्यांत निकाली काढण्याची शिफारस केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला केल्याची माहिती केंद्रीय विधी मंत्री रविशंकर प्रसाद यांनी नुकतीच दिली आहे.

मुळात प्रश्न असा आहे की, समाज म्हणून आपण स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कधी बदलणार? स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहण्याचे आपण कधी थांबवणार? हैदराबाद किंवा उन्नाव या दोन्ही ठिकाणच्या घटनांमध्ये अक्षरशः रानटी मानसिकतेचे किळसवाणे प्रदर्शन घडले. हैदराब घटनेतील एक आरोपी तर विवाहित आहे, असे असतानाही त्याला एका निरपराध स्त्रीवर अत्याचार का करावासा वाटला, याचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. ही मानसिकताच समूळ बदलणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी लहानपणापासून धडे दिले गेले पाहिजेत. या घटना कोणत्याही समाजासाठी मान शरमेने खाली घालायला लावणाऱ्या असतात. त्यामुळे त्या घडल्यानंतर आक्रोश करण्यापेक्षा त्या घडूच नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे हाच सर्वोत्तम उपाय ठरेल.

VRahatkar

**विजया रहाटकर,** मुख्य संपादक आणि
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

# आमदार कुलदीप सेंगर याला जन्मठेप

## उन्नाव बलात्कार प्रकरणी पीडितेला २५ लाख रुपयांची भरपाई देण्याचेही आदेश



**दिल्ली :** उन्नाव बलात्कार प्रकरणी भाजपचा निलंबित आमदार कुलदीप सेंगर याला तीस हजारी कोर्टाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. ही शिक्षा ठोठावताना कोर्टाने कुलदीप सेंगर याला पीडितेला २५ लाख रुपयांची भरपाई देण्याचेही आदेश दिले आहेत. सेंगरला कोर्टाने १६ डिसेंबरला भादंवि ३७६, पॉक्सो कायद्यातील कलम ५ (सी) अंतर्गत दोषी ठरवले होते. उन्नाव येथे २०१७मध्ये एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आला होता. या प्रकरणात आमदार कुलदीपसिंग सेंगर दोषी असल्याचे स्पष्ट झाले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार हा खटला लखनऊ येथील न्यायालयातून दिल्ली न्यायालयात वर्ग करण्यात आला होता. ५ ऑगस्टपासून या खटल्याची दैनंदिन सुनावणी झाली. या प्रकरणी कुलदीप सेंगर व सहआरोपी शशी सिंग याच्याविरोधात गुन्हेगारी कट रचणे, अपहरण, बलात्कार आदींशी संबंधित कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले होते.

उत्तर प्रदेशमधील बांगरमऊ विधानसभा मतदारसंघातून कुलदीप सेंगर चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आला. २०१७ मध्ये एका युवतीचे अपहरण केल्यानंतर कुलदीप सेंगरने पीडितेने बलात्कार केला होता. या घटनेवेळी पीडित युवती अल्पवयीन होती. बलात्काराचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर भाजपने सेंगरला पक्षातून निलंबित केले. ऑगस्टमध्ये सेंगर आणि सहआरोपी शशी सिंहविरोधात गुन्हेगारी कट, अपहरण, बलात्कार आणि पॉक्सो कायद्यांतर्गत आरोप निश्चित करण्यात आले होते.

### पीडितेला जीवे मारण्याचा प्रयत्न

पीडित युवतीच्या कारला २८ जुलै रोजी एका ट्रकने जोरदार धडक दिली होती. या अपघातात पीडित युवती गंभीर जखमी झाली होती. मात्र, या अपघातात पीडितेचे दोन नातेवाईक ठार झाले होते. या अपघातानंतर पीडितेच्या कुटुंबीयांनी या अपघातामागे सेंगरचा कट असल्याचा आरोप केला होता. सुप्रीम कोर्टाने उन्नाव बलात्कार प्रकरणी दाखल सर्व पाच प्रकरणे लखनऊ कोर्टातून दिल्लीतील कोर्टात वर्ग केली होते.

## उन्नाव बलात्कार प्रकरणाचा घटनाक्रम

**४ जून २०१७** : नोकरी मिळवण्यासाठी मदत मागायला कुलदीप सिंह सेंगरकडे गेलेली असताना या आमदाराच्या घरी आपल्यावर बलात्कार करण्यात आल्याचा आरोप पीडित मुलीने केला.

**११ जून २०१७** : यानंतर ११ जूनला ही मुलगी बेपत्ता झाली. यानंतर या मुलीच्या कुटुंबाने ती हरवल्याची तक्रार दाखल केली.

**२० जून २०१७** : औरैयाच्या एका गावात ही मुलगी सापडली आणि दुसऱ्या दिवशी तिला उन्नावमध्ये आणण्यात आलं.

**२२ जून २०१७** : पीडितेला कोर्टात हजर करण्यात आलं. आणि CrPCच्या कलम १६४ खाली तिचा जबाब नोंदवण्यात आला. हा जबाब देताना पोलिसांनी आमदार कुलदीप सिंह सेंगरचं नाव घेऊ न दिल्याचा आरोप पीडित मुलीने केला होता.

**३ जुलै २०१७** : जबाब नोंदवण्यात आल्याच्या १० दिवसांनंतर पोलिसांनी या मुलीला कुटुंबाकडे सोपवलं आणि पीडिता दिल्लीत आली. पोलिसांनी आपलं शोषण केल्याचं पीडितेने म्हटलं. आमदार कुलदीप सिंह सेंगर आणि त्यांचा भाऊ अतुल सिंह सेंगर यांची नावं FIRमध्ये सामील करण्यात यावी, अशी मागणी पीडित मुलीने उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे केली होती.

**२४ फेब्रु. २०१८** : पीडितेच्या आईने पुढे येत उन्नावच्या मुख्य ज्युडिशल कोर्टाकडे CrPCच्या कलम १५६(३)नुसार FIR दाखल करण्याची मागणी केली.

**३ एप्रिल २०१८** : कुलदीप सिंह सेंगर यांचा भाऊ अतुल सिंह सेंगर याने मुलीच्या वडिलांना मारहाण केली.

**४ एप्रिल २०१८** : यानंतर उन्नाव पोलिसांनी या मुलीच्या वडिलांवर बेकायदेशीररीत्या हत्यारं बाळगण्याचा आरोप ठेवत त्यांना आर्म्स ॲक्टअंतर्गत अटक केली.

**८ एप्रिल २०१८** : FIR दाखल करण्याच्या मुद्यावरून पीडित मुलीने मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्या घरासमोर आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी पोलिसांनी प्रतिसाद न दिल्याचा आरोप करण्यात आला आणि एफआयआर दाखल करण्यात आल्यानंतर आपल्याला त्रास देण्यात येत असल्याचा आरोप या मुलीच्या कुटुंबाने केला.

**९ एप्रिल २०१८** : या मुलीच्या वडिलांचा कोठडीत मृत्यू झाला.

**१० एप्रिल २०१८** : पोस्टमॉर्टेममध्ये त्यांच्या शरीरावर १४ ठिकाणी जखमा झाल्याचं आढळलं. या प्रकरणी सहा पोलिसांना बडतर्फ करण्यात आलं आणि न्यायालयीन तपासाचे आदेश देण्यात आले.

**११ एप्रिल २०१८** : राज्यातल्या योगी सरकारने हे प्रकरण सीबीआयकडे सोपवलं.

**१२ एप्रिल २०१८ :** अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणी आमदार कुलदीप सिंह सेंगरला आरोपी बनवण्यात आलं. पण अटक मात्र करण्यात आलं नाही. अलाहाबाद हायकोर्टाने या प्रकरणाची दखल घेत कुलदीप सिंह सेंगरला अटक करण्यात येणार की नाही, याविषयी विचारणा केली.

**१३ एप्रिल २०१८ :** सीबीआयने सेंगरना चौकशीसाठी ताब्यात घेतलं त्यानंतर अटक करण्यात आली आणि नवीन एफआयआर दाखल करण्यात आली.

**११ जुलै २०१८ :** या प्रकरणी सीबीआयने पहिली चार्जशीट दाखल केली ज्यामध्ये कुलदीप सिंह सेंगरचं नाव होतं.

**१३ जुलै २०१८ :** या प्रकरणातली दुसरी चार्जशीट दाखल करण्यात आली. आणि पीडीत मुलीच्या वडिलांना तथाकथितरित्या अडकवण्याप्रकरणी कुलदीप सेंगर, त्यांचा भाऊ अतुल सेंगर आणि काही पोलिसांना आरोपी बनवण्यात आलं. या प्रकरणी कुलदीप सेंगर, अतुल सेंगरसह सात आरोपी आहेत.

**२८ जुलै २०१९ :** पीडीत मुलगी आपली काकी, मावशी आणि वकिलांसोबत रायबरेलीला जात असताना त्यांच्या कारला ट्रकने धडक दिली. हा अपघात इतका भयानक होता की यामध्ये या मुलीच्या काकीचा आणि मावशीचा मृत्यू झाला. पीडीत मुलगी आणि तिच्या वकिलांना उपचारांसाठी लखनऊच्या किंग जॉर्ज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आणि दोघांनाही लाईफ सपोर्ट सिस्टीमवर ठेवण्यात आलं. ज्या ट्रकने कारला धडक दिली होती त्याच्या नंबरप्लेटवर ग्रीस लावून नंबर लपवण्यात आला होता.

Loading videoWarning: Third party content may contain adverts

**१ ऑगस्ट २०१९ :** त्यावेळचे चीफ जस्टिस रंजन गोगोई यांनी पाचही प्रकरणं लखनऊच्या कोर्टातून दिल्लीच्या सीबीआय कोर्टात हलवण्याचे आदेश दिले. या प्रकरणाची सुनावणी रोज व्हावी आणि ४५ दिवसांत सुनावणी पूर्ण करण्यात यावी असे आदेश त्यांनी दिले.

**२ ऑगस्ट २०१९ :** पीडीत मुलीच्या काकांना सुरक्षेच्या कारणास्तव रायबरेलीतल्या तुरुंगातून दिल्लीच्या तिहार जेलमध्ये हलवण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले.

**५ ऑगस्ट २०१९ :** पीडित मुलीवर अधिक चांगले उपचार करता यावेत यासाठी तिला लखनऊमधून दिल्लीला आणण्यात यावं असं आदेश सुप्रीम कोर्टाने दिले.

**९ ऑगस्ट २०१९ :** दिल्लीतल्या सत्र न्यायालयाने कुलदीप सेंगरविरोधातले आरोप निश्चित केले. त्यांच्यावर बलात्कार [३७६(१)] आणि कट रचणे [(१२० B)] सह भारतीय दंड संहितेच्या अनेक कलमांखाली आरोप लावण्यात आले आहेत. सोबतच पॉक्सो कायद्याच्या कलम तीन आणि चार नुसारही प्रकरण दाखल करण्यात आलेलं आहे.

**१४ ऑगस्ट २०१९ :** पीडीत मुलीच्या वडिलांच्या मृत्यू प्रकरणी सेंगरसह नऊ लोकांवर कोर्टाने आरोप निश्चित केले.

Loading videoWarning: Third party content may contain adverts




**७ सप्टेंबर २०१९ :** पीडीत मुलीचा जबाब नोंदवण्यासाठी दिल्लीतल्या एम्स हॉस्पिटलमध्ये तात्पुरतं न्यायायस स्थापन करण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले.

**२९ सप्टेंबर २०१९:** कोर्टाच्या आदेशानुसार या पीडीत मुलीची आणि तिच्या कुटुंबाची दिल्लीमध्ये तात्पुरती (११ महिन्यांसाठी) राहण्याची सोय सुरक्षित ठिकाणी करण्यात आल्याचं दिल्लीच्या महिला आयोगाने सांगितलं.

**११ ऑक्टोबर २०१९:** पीडीतेच्या कारवर हल्ला करण्याप्रकरणी सीबीआयने कुलदीप सेंगरच्या विरुद्ध चार्जशीट दाखल केली.

**१० डिसेंबर २०१९:** कोर्टाने आपला निकाल १६ डिसेंबरपर्यंत राखून ठेवला. जर कोणत्याही मुद्द्याबाबत दोन्ही पक्षांकडून नव्याने युक्तीवाद करण्याची मागणी करण्यात आली नाही, तर निकाल सुनावण्यात येईल.

**१६ डिसेंबर २०१९:** उन्नाव बलात्कार प्रकरणी कुलदीप सेंगर यांना जन्मठेपेची शिक्षा

# राज्य महिला आयोग सर्वोच्च न्यायालयात

## पुण्यातील गहुंजे बलात्कार, खून प्रकरण

### फाशी रद्द करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला नसल्याचा युक्तिवाद

### विनंती पत्रालाच विशेष याचिका म्हणून स्वीकारण्याचे सरन्यायाधीशांना साकडे



**मुंबई :** फाशी देण्यातील दिरंगाईमुळे पुण्यातील गहुंजे सामूहिक बलात्कार व खून प्रकरणातील दोन आरोपींची फाशीची शिक्षा रद्द करून जन्मठेप देण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाचा धक्कादायक निकाल रद्द करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने सरन्यायाधीश यांच्याकडे विशेष पत्राद्वारे केली आहे. या पत्रालाच विशेष याचिका म्हणून स्वाधिकारे स्वीकारावे, अशी विनंतीही आयोगाने केली आहे. "फाशी रद्द करणे म्हणजे पीडितेला न्याय नाकारणे आणि तसा अधिकार उच्च न्यायालयाला नाही," असा युक्तिवाद आयोगाने केला आहे.

आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी देशाचे सरन्यायाधीश न्या. शरद बोबडे यांना पाठविलेल्या या पत्रामध्ये गहुंजे बलात्कार व खून प्रकरणाची स्वाधिकारे दखल घेण्याची विनंती केली आहे. फाशीच्या शिक्षेवर अंतिम शिक्कामोर्तब करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. तसेच राज्यघटनेच्या कलम ७२ अन्वये दयेचा अर्ज मा. राष्ट्रपतींनी फेटाळलेला असताना फाशी रद्द करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला नाही. तसेच फाशी देण्यातील दिरंगाईमुळे ती रद्द करता येऊ शकते; पण तो अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयाला आहे, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानेच शत्रुघ्न चव्हाण विरुद्ध भारत सरकार या खटल्यात दिला आहे," याकडे आयोगाने लक्ष वेधले आहे.

"गहुंजे प्रकरणातील पीडितेच्या मारेकरयांना, त्यांच्या कौर्याला केवळ शिक्षेच्या अंमलबजावणीमधील दिरंगाईमुळे फाशी होत नाही, हे पचवणे अतिशय अवघड आहे. म्हणूनच मा. उच्च न्यायालयाचा निर्णय मनाला पटणारा नाही. बारा वर्षांनंतरही पीडितेला न्याय मिळत नाही, हे अस्वस्थ करणारे आहे. त्यामुळे आम्ही मा. सरन्यायाधीशांना साकडे घालण्याचा निर्णय घेतला आहे. पीडितेचा न्याय नक्की मिळण्याची खात्री वाटते आहे," अशी प्रतिक्रिया विजया रहाटकर यांनी व्यक्त केली.

१ नोव्हेंबर २००७ रोजी पुण्यातील एका प्रथितयश बीपीओ कंपनीमध्ये काम करणारया २२ वर्षीय युवतीचा गहुंजेजवळ बलात्कार आणि खून झाला होता. या घटनेने मोठी खळबळ उडाली होती. हे कृत्य करणारे कॅबचा चालक पुरुषोत्तम दशरथ बोराटे आणि त्याचा मित्र प्रदीप यशवंत कोकडे याला पुण्यातील सत्र न्यायालयाने २०१२ मध्ये फाशी ठोठावली. पुढे लगेचच २५ सप्टेंबर २०१२ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने ती शिक्षा कायम केली. ८ मे २०१५ रोजी सर्वोच्च न्यायालयानेही या फाशीवर शिक्कामोर्तब केले. २६ मे २०१७ रोजी तत्कालीन राष्ट्रपती मा. श्री. प्रणव मुखर्जी यांनी या दोघांच्या दयेचा अर्ज फेटाळून लावल्यानंतर फाशीचा मार्ग मोकळा झाला होता. मात्र, ही फाशी देण्यात दिरंगाई झाल्याने २९ जुलै २०१९ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने फाशी रद्द करून त्या दोघा दोषींना जन्मठेप ठोठावली. मा. उच्च न्यायालयाच्या या आश्चर्यकारक व धक्कादायक निकालावर मोठी प्रतिक्रिया उमटली होती. फाशीची शिक्षा जन्मठेपेत बदलल्याने पीडितेला न्याय मिळालेला नाही, अशी तीव्र भावना समाजात निर्माण झाली. त्यामुळेच महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा, १९९३मधील अधिकारांचा वापर करून या प्रकरणातील न्यायालयीन लढाईत सहभागी होण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

**त्या पार्श्वभूमीवर आपल्या विनंती पत्रालाच विशेष याचिका म्हणून स्वीकारण्याची विनंती सरन्यायाधीशांना केली आहे. या पत्रात आयोगाने प्रमुख पाच मुद्द्यांच्या आधारे मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाविरुद्ध दाद मागितली आहे. ते मुद्दे पुढीलप्रमाणे :**

- केवळ दिरंगाईच्या आधारे फाशी रद्द करणे, हे पीडितेला न्याय नाकारणारे आहे. त्याबाबत समाजाची भावना अतिशय तीव्र आहे.
- फाशीवर अंतिम शिक्कामोर्तब करण्याचा अधिकार केवळ सर्वोच्च न्यायालयाला आहे, मग ती रद्द करण्याचा अधिकारही सर्वोच्च न्यायालयाचा आहे.
- यापूर्वी वेगवेगळ्या कारणांनी फाशीची शिक्षा जन्मठेपेत बदललेली आहे; पण तो अधिकार केवळ सर्वोच्च न्यायालयाचा आहे.
- राज्यघटनेतील कलम ७२ अन्वये राष्ट्रपतींनी दयेचा अर्ज फेटाळला असताना फाशी रद्द करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला आहे का, याबाबतचा अंतिम निवाडा अद्यापही सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.
- या प्रकरणात उच्च न्यायालयाने फाशी रद्द करताना अधिकाराची लक्ष्मणरेषा ("ultra vires") ओलांडली आहे. यामुळे पीडितेचा हक्क व न्याय यांच्यावर गदा आली आहे.

# राज्य महिला आयोगाने पुण्यातील गहुंजे बलात्कार, खून प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले विनंतीपत्र.

**No.MMA-2019/CJ/D-07**
Date :- 09.12.2019

To,

**The Hon'ble Chief Justice of India,**
Supreme Court India,
Tilak Marg, New Delhi- 110 001.

***Subject*** : ***Humble request for taking sou moto action in the matter of commuting the death sentence into life imprisonment by Bombay High Court.***

***Reference*** : ***Judgment dated 29/07/2019 passed by the High court Bombay in W.P.No. 2607/2019 along with W.P.No.2609/2019.***

**MAY IT PLEASE YOUR HONOUR :**

I) The deceased victim in the present case were employee of BPO company in Pune Dist. of Maharashtra, who was raped and brutally murdered by the accused, therefore the crime no. 284 of 2008 under section 302, 376 (ii), (g), 364 and 404 read with 120 – B has been registered against them. The Session Court held the Accused guilty and awarded the death sentence. Which was upheld by the High Court Bombay on 25.09.2012 while dismissing Criminal Appeal No. 632/2012 filed by the both accused in Confirmation Case No. 1/2012. Against which the Accused person filed Criminal Appeal No. 1439/2013 before the Hon'ble Appex Court, which was came to be dismissed on 8.5. 2015. And therefore after 8.5.2015, the sentence of death ought to have been executed within 90 days. The Mercy Petitions filed by the Accused was also rejected by Hon'ble Governor Maharashtra and the Hon'ble President.

II) Since 08.05.2015 till 24.06.2019 the death sentence was not executed the Accused person filed the under referenced writ petition before the High Court Bombay and while deciding the above writ petitions on 29.07.2019 the High Court held that delay of 1507 days i.e. 4 years 1 month and 6 days on part of Administration is unavoidable/ unconstitutional hence, commuted death penalty into life imprisonment.

III) However the Maharashtra State Commission for Women is on opinion that the judgment passed by the Bombay High Court is procedurally irregular and has to be suo motto recall by the Hon'ble Supreme Court on the following amongst the grounds;

a) Commutation of death penalty in to life imprisonment only on the ground of delay caused by the administration is miscarriage of justice towards Victim.

b) The judgment dated 29.07.2019 passed by the High Court of commutation of death penalty in life imprisonment is wrong when the Mercy Petition w.r.t. to the same is rejected by the Hon'ble President of India.

c) The question of the authority held by the High Courts, w.r.t. quashing of death awards, of whose mercy petitions are rejected under Art. 72 of the Constitution of India, is a matter sub judice in the Apex Court in the case of Union of India Vs. Sonu Sardar – SLP (Cri.) No. 008357-008357/2017.

d) As held in Shatrughan Chavan vs. Union of India & Ors. cited under (2014) 3 SCC 1, unnecessary delay caused in execution of death penalty can lead to the commutation of same but only by the Supreme Court.

e) In a number of precedents, it is observed that, in each case when the death penalty was commuted post rejection of Mercy Petitions, the same was done only by the Supreme Court and not by the High Courts.

f) In the instant matter, the High Court has gone ultra vires in commuting the said sentence. Such arbitary commutation would be abrogation of rights and gross miscarriage of justice towards the victim.

g) The judgment given by the Hon'ble Bombay High Court is not only miscarriage of justice but it has also caused huge social discontent.

IV) The Maharashtra State Commission for Women is under section 10 (d) & (e) of Maharashtra State Commission for Women Act, 1993 empowered to do following acts "

(d) review, from time to time, the exiting provisions of the Constitution and other laws affecting women and recommend amendments thereto so as to suggest remedial legislative measures to meet any lacunae inadequacies or shortcomings in such legislations;

(e) take of the cases of violation of the provisions of the constitutions and of other laws relating to women with the State Government or appropriate authorities;

(f) entertain complaints and sou motu notice of matters relating to, -

(i) Deprivation of women's right ;

(ii) Non- implementation of laws enacted provide protection to women and also to achieve the objective of equality and development;

In view of the above the Maharashtra State Commission for Women request your Honour to treat the present letter as their petition and invoke the extraordinary jurisdiction of Hon'ble Supreme Court and suo motto recall the judgment dated 29/07/2019

***FOR THIS ACT OF KINDNESS THE MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN SHALL EVER PRAY:***

Place : Mumbai, Maharashtra

Date : 10/ 12 /2019

Your Sincerely,

**(Vijaya Kishore Rahatkar)**

Chairperson

# हैदराबाद प्रकरणातील चार आरोपी पोलिस चकमकीत ठार

**हैदराबाद :** पशुवैद्यक तरुणीवर सामूहिक बलात्कार करून तिला जिवंत जाळण्याचा आरोप असलेले चारही आरोपी आज पोलिसांसोबत झालेल्या चकमकीमध्ये ठार झाले. हैदराबादनजीक अत्याचार झालेल्या घटनास्थळीच सकाळी ही चकमक घडली. या घटनेवर देशभरातून संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. सर्वसामान्यांनी कारवाईचे स्वागत केले. त्याचबरोबर अनेकांनी पोलिसांच्या भूमिकेवर आक्षेप घेतला.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने याची दखल घेत चकमकीच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.आरोपींनी मूळ गुन्हा नेमका कसा केला, याची पडताळणी करण्यासाठी पोलिसांचे एक पथक या चारही आरोपींना घेऊन हैदराबादनजीकच्या घटनास्थळी गेले होते. तेव्हा हे आरोपी पोलिसांचीच शस्त्रे घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार केला, यात चारहीजण घटनास्थळीच ठार झाले.. हैदराबाद पोलिसांच्या या एन्काउंटरवर आज देशभरात गल्लीपासून ते दिल्लीतील संसदेपर्यंत सर्वत्र पडसाद उमटले. पोलिसांनी या प्रकरणातील सर्व आरोपींना पहाटेच घटनास्थळी आणले होते, ज्या ठिकाणी ही चकमक झाली, तो परिसर हैदराबादला लागूनच आहे. पोलिस अधिकारी गुन्ह्याची तालीम घेत असताना आरोपींनी त्यांची शस्त्रे बळकावित पोलिसांवर गोळीबार करून पळ काढण्याचा प्रयत्न केला. या वेळी पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारामध्ये चारही आरोपी मारले गेले.

या चकमकीमध्ये दोन पोलिस कर्मचारीदेखील जखमी झाले आहेत. प्रत्यक्ष चकमकस्थळी दहा पोलिसांची उपस्थिती होती. या चकमकीनंतर पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून एक मोबाईल आणि दोन शस्त्रेही जप्त केली. या चारही आरोपींनी पशुवैद्यक असणाऱ्या तरुणीवर सामूहिक बलात्कार करून तिला जिवंत जाळले होते, पोलिस चौकशीदरम्यान त्यांनी तशी कबुली दिली होती.

या सर्वांना २९ नोव्हेंबर रोजी अटक करण्यात आली होती. या घटनेनंतर देशभरात प्रचंड जनक्षोभ निर्माण झाला होता. न्यायालयाने या चारही आरोपींना सात दिवसांची न्यायालयीन कोठडी ठोठावली होती. दरम्यान, पीडित तरुणीचे वडील आणि बहिणीने या चकमकीचे स्वागत करत तेलंगण पोलिसांचे आभार मानले आहेत. दिल्लीतील निर्भयाच्या माता-पित्यांनीही पोलिसांच्या या कृत्याचे समर्थन केले आहे. दरम्यान, या चकमकीचे वृत्त समजल्यानंतर लोकांनी तेलंगण पोलिस जिंदाबादच्या घोषणा देत त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली.

**वृत्तसौजन्य : सकाळ**

**“ या चकमकीतील पोलिस अधिकाऱ्यांवर कसल्याही प्रकारची दंडात्मक कारवाई केली जाऊ नये.**
**- निर्भयाची आई**

**“ हैदराबादेतील पीडितेच्या कुटुंबीयांना सात वर्षे वाट पाहावी लागली नाही. पोलिसांनी आरोपींना मारून योग्यच केले.**
**- निर्भयाचे वडील**



## अशी झाली चकमक

- आरोपींना पोलिसांनी पहाटे ५.४५ च्या सुमारास गाडीमधून घटनास्थळी आणले
- आरोपींची पोलिसांवर दगडफेक
- मोहंमद आरिफने बंदूक हिसकावली
- पोलिसांच्या दिशेने आरिफचा गोळीबार
- आरोपींना शरण येण्याचा इशारा
- प्रत्युत्तरादाखल पोलिसांचाही गोळीबार
- आरोपींचा घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न
- पोलिसांनी पुन्हा केलेल्या गोळीबारात सर्वजण ठार
- चकमक साधारणपणे सव्वासहाला संपली

**“ या नराधमांना चकमकीत ठार मारण्यात आल्याचे आम्हाला टीव्हीवरूनच समजले, आम्ही आनंदी आहोत. मी तेलंगण सरकार आणि पोलिसांचे आभार मानतो.**
**- हैदराबादेतील पीडितेचे वडील**



**“ कायद्याने त्याचे काम केले आहे, एवढेच मी या निमित्ताने सांगू शकतो. आम्ही चौकशीबाबत मानवी हक्क आयोगालाही सांगू, यासंबंधीचा अहवाल सरकारला सादर केला जाईल.**
**- व्ही. सी. सज्जनार,**
पोलिस आयुक्त, सायबराबाद

# हैदराबाद चकमकीबाबत संमिश्र भावना



## महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांची प्रतिक्रिया

**मुंबई :** ''हैदराबादमधील बलात्कार आणि खून झालेल्या डॉक्टर युवतीला न्याय नक्कीच हवा होता. पण तो कायद्याच्या कक्षेत आणि गुन्हेगारी न्याय प्रणालीमधील निश्चित प्रक्रियेनुसार मिळायला हवा होता. त्यामुळेच या प्रकरणातील चार आरोपींचा पोलिस चकमकीमध्ये मृत्यू होण्याच्या घटनेबाबत संमिश्र भावना आहेत,'' अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केली.

''एकीकडे हे चार आरोपी पोलिस चकमकीमध्ये मारले गेल्याने गुन्हेगारांना जरब बसेल. महिलांना उपभोग्य वस्तू समजणारयांना कडक संदेश जाईल आणि त्याचबरोबर पीडित डॉक्टर युवतीला व तिच्या नातेवाईकांना न्याय मिळेल, असे वाटते. पण दुसरीकडे मात्र, आरोपींना शिक्षा कायद्याच्या चौकटीतच व्हायला हवी होती. कायदा कोणीही हाती घेता कामा नये,'' असे श्रीमती रहाटकर म्हणाल्या.

कोणतीही चकमक ही कायदेबाह्य असली तरी ती करणे पोलिसांना का भाग पडले? आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना स्व-संरक्षण म्हणून पोलिसांनी शेवटचा पर्याय म्हणून चकमक केली का?, हेही समजून घ्यावे लागेल, असे सांगून त्या म्हणाल्या, ''आरोपी मारले गेल्याने जनतेला हायसे वाटते आहे. ती पोलिसांचे कौतुक करीत आहे. पण चकमकीचा जनतेला जल्लोष का करावा वाटतोय?, याचे उत्तर सोपे आहे. न्यायप्रक्रियेमधील दिरंगाईने जनतेचा संयम संपत चाललेला आहे. निर्भया प्रकरणातील आरोपींना सात वर्षांनंतर फाशी होत नाही. तिहारसारख्या महत्वाच्या तुरूंगात तर फाशी देणारा गँगमन उपलब्ध नसतो. पुण्यातील ज्योतिकुमारी बलात्कार आणि खून प्रकरणातील आरोपींची फाशीची शिक्षा केवळ तांत्रिक मुद्द्यांवर रद्द केली जाते... मग न्याय मिळण्याचा विश्वास जनतेला कसा वाटेल? संथ न्यायप्रक्रिया आणि न्यायालयीन प्रक्रियांचा अनेक हितसंबंधी घटकांकडून होणारा वारंवार गैरवापर यामुळे आता न्यायप्रणाली कार्यक्षम करण्याशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही. न्याय मिळालाच पाहिजे आणि तो मिळतो आहे, अशा विश्वास जनतेला वाटला पाहिजे. म्हणूनच हैदराबाद चकमकीबाबत संमिश्र भावना आहेत.''

### कालमर्यादेसाठी कायद्यात बदल हवेत

देशात सातशेहून अधिक द्रूतगती न्यायालये (फास्ट ट्रक कोर्टस) आहेत. सुमारे एक हजारांहून अधिक द्रूतगती न्यायालये स्थापन होण्याच्या प्रक्रियेत आहेत, अशी माहिती देऊन श्रीमती रहाटकर यांनी महिलांवरील गंभीर अत्याचारांच्या गुन्ह्यांचे खटले चालविण्याची निश्चित कालमर्यादा ठरविण्याची तरतूद कायद्यामध्ये करण्याची सूचना केली. मध्यंतरी लहान बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यामध्ये (पोक्सो) तशी तरतूद केल्याचे त्यांनी सांगितले.



### दोन सदस्यीय न्यायाधीशांच्या समितीची स्थापना

**बलात्काच्या प्रकरणांचा निकाल तातडीने लागावा यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एका समितीची स्थापन केली आहे. मुख्य न्यायाधीश एस. ए. बोबडे यांनी न्यायाधीश सुभाष रेड्डी आणि न्यायाधीश एम. आर. शाह यांच्या या द्विसदस्यीय समितीची स्थापना केली.**

### रहाटकर यांच्याकडून स्वागत

**बलात्कार आणि पोक्सो कायद्यांतर्गत चालविण्यात येणाऱ्या खटल्यांच्या जलद निपटाऱ्यासाठी द्विसदस्यीय समिती नेमण्याच्या सरन्यायाधीश शरद बोबडे यांच्या निर्णयांचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी स्वागत केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या थेट देखरेखीमुळे फौजदारी न्याययंत्रणेत अधिक सुसूत्रता येईल, असे रहाटकर यांनी म्हटले आहे.**

# उन्नावमधील पीडितेच्या मृत्यूनंतर जनक्षोभ

**नवी दिल्ली :** उन्नावमधील बलात्कार पीडित तरुणीची मृत्यूशी सुरू असलेली झुंज तब्बल चाळीस तासांनी शुक्रवारी रात्री संपल्यानंतर आज देशभर पुन्हा मोठा जनक्षोभ उसळला. या घटनेच्या निषेधार्थ संतप्त नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रस्त्यांवर उतरत आंदोलन केले. उन्नावमधून सुरू झालेला हा आंदोलनाचा वणवा लखनौमार्गे दिल्लीपर्यंत पोचला. महिलांनी रात्री राजघाट ते इंडिया गेट असा कँडल मार्च काढला होता. या वेळी काही आंदोलकांनी पोलिसांनी उभारलेले बॅरिकेड तोडण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी त्यांच्यावर पाण्याच्या फवाऱ्याचा मारा केला. दक्षिण दिल्लीत सुरू झालेले हे आंदोलन पाहता पाहता संपूर्ण दिल्लीत पसरले. पूर्व दिल्लीतील राजघाट परिसर, आयटीओ परिसर येथे निदर्शकांनी वाहतूक रोखून धरली. याच ठिकाणी पोलिस मुख्यालय आहे. पूर्व दिल्ली, कॅनॉट प्लेस, इंडिया गेट, जंतर-मंतर अशा सर्वच परिसरांत आंदोलकांनी एकत्र येत रोष व्यक्त केला. विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार उत्स्फूर्त होता.

दरम्यान, उन्नावमधील बलात्कारपीडित तरुणीची मृत्यूशी सुरू असलेली झुंज शुक्रवारी रात्री दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात संपली. हृदयविकाराच्या झटक्याने पीडितेचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. स्वतःवरील अन्यायाचा पाढा वाचण्यासाठी 'ती' न्यायमंदिराच्या दिशेने जात असतानाच जामिनावर सुटलेल्या आरोपींनी तिला जिवंत पेटविले होते. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणाची जलदगती न्यायालयामध्ये सुनावणी घेण्याचे आदेश दिले. या घटनेचा निषेध म्हणून समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनीही आज विधिमंडळाबाहेर धरणे आंदोलन केले, तर काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी पीडितेच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांना संरक्षण देण्याची मागणी केली. नराधमांच्या हल्ल्यामध्ये ही पीडिता नव्वद टक्के भाजली होती. आम्ही खूप प्रयत्न करूनदेखील तिला वाचवू शकलो नाही, अशी खंत डॉ. शलाब कुमार यांनी व्यक्त केली. आज संबंधित पीडितेचे शवविच्छेदन करण्यात आले आणि त्यानंतर तिचा मृतदेह कुटुंबीयांच्या हवाली करण्यात आला. यानंतर तो तिच्या मूळगावी नेण्यात आला. उन्नावमधील पीडितेच्या मूळगावी कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

> **या प्रकरणातील सर्वच आरोपींना अटक करण्यात आली असून, हा खटलादेखील जलदगती न्यायालयामध्ये चालवून दोषींना कठोर शिक्षा केली जाईल.**
> – **योगी आदित्यनाथ,** मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश

> **उन्नावमधील नराधमांना हैदराबादप्रमाणेच गोळ्या घाला किंवा त्यांना मरेपर्यंत फाशी द्या. मला सरकारकडून कसल्याही प्रकारची मदत नको आहे. मी फक्त त्या नराधमांना मेलेले पाहू इच्छितो.**
> – **उन्नावमधील पीडितेचे वडील**

### जबाब नोंदविला

उन्नावमधील पीडितेने उपविभागीय न्यायदंडाधिकारी दयाशंकर पाठक यांच्याकडे जबाब नोंदविला होता. यामध्ये तिने हरिशंकर त्रिवेदी, रामकिशोर त्रिवेदी, उमेश वाजपेयी, श्याम त्रिवेदी आणि शुभम त्रिवेदी यांनी हल्ला करीत पेटवून दिल्याचे म्हटले होते. याच प्रकरणातील शिवम, शुभम त्रिवेदीने डिसेंबर २०१८ मध्ये तिचे अपहरण करीत तिच्यावर बलात्कार केला होता.



नवी दिल्ली : देशभरातील महिला अत्याचाराच्या वाढत्या घटनांचा निषेध करत शनिवारी महिलांनी उत्स्फूर्तपणे रस्त्यावर उतरत कँडल मार्च काढला.



# मुख्यमंत्रिपदी उद्धव ठाकरे

**मुंबई :** महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ गुरुवारी (२८ नोव्हेंबर) शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी शिवाजी पार्क मैदानावर घेतली. शिवाजी पार्क मैदानावर उद्धव ठाकरे यांचा शपथविधी सोहळा पार पडला. राज्यपाल भगसिंग कोश्यारी यांनी ही शपथ उद्धव ठाकरेंना दिली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या पाठिंब्यावर उद्धव ठाकरेंनी सरकार स्थापन केले. त्यानंतर जमलेल्या सगळ्या उपस्थितांसमोर आणि जनतेसमोर उद्धव ठाकरे नतमस्तक झाले.

शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या महाविकास आघाडीचे प्रमुख नेते म्हणून उद्धव ठाकरेंची निवड करण्यात आली होती. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यानंतर एकनाथ शिंदे आणि सुभाष देसाई या शिवसेनेच्या दोन नेत्यांनीही शपथ घेतली. राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ आणि जयंत पाटील यांनीही शपथ घेतली. इतर मंत्र्यांचाही शपथविधी लवकरच पार पडणार आहे.

उद्धव ठाकरे यांच्या खांद्यावर सध्या शिवसेनेची धुराही आहे. ते शिवसेनेचे पक्षप्रमुख आहेत. उद्धव ठाकरे यांना त्यांचे वडील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, आई मीनाताई आणि आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांचा समृद्ध वारसा लाभला आहे. तसेच बाळासाहेब ठाकरे यांनी पायाभरणी केलेल्या आणि शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या दैनिक सामनाची धुरा उद्धव ठाकरे यांनी मुख्य संपादक म्हणून सांभाळली. २९ जुलै १९६० रोजी मुंबईत उद्धव ठाकरे यांचा जन्म झाला.

उद्धव ठाकरे जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे स्नातक असून, त्यांच्या छायाचित्रांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्यातील जागतिक दर्जाच्या छायाचित्रकाराचे दर्शन विविध प्रदर्शनांच्या माध्यमातून रसिकांना घडले आहे.

## राजकीय कारकीर्द

उद्धव ठाकरे यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात विद्यार्थी दशेपासून झाली. शिवसेनेच्या माध्यमातून सामाजिक आणि राजकीय जीवनात सक्रीय असलेल्या ठाकरे यांच्याकडे २००२ च्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची जबाबदारी आली आणि महापालिकेवर शिवसेनेची सत्ता स्थापन करीत त्यांनी ती यशस्वीरीत्या पूर्ण केली.

या निवडणुकीने त्यांच्यातील राजकीय नेतृत्वगुण संपूर्ण राज्याने अनुभवले. २००३ मध्ये पक्षाने त्यांच्याकडे कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आणि २००४ मध्ये त्यांना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आपला उत्तराधिकारी म्हणून घोषित केलं.

## व्यक्तिगत जीवन

उद्धव ठाकरे यांचा विवाह रश्मी यांच्याशी झाला असून त्यांना आदित्य आणि तेजस अशी दोन मुले आहेत. आदित्य ठाकरे आजोबा आणि वडिलांचा राजकारणाचा वसा पुढे चालवित आहेत. ते सध्या युवा सेनाप्रमुख असून वरळी विधानसभा मतदारसंघातून निवडून आले आहेत.

## छायाचित्रकार ते मुख्यमंत्री

महाराष्ट्राच्या भौगोलिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अशा अलौकिक सौंदर्याचे मूर्तीमंत आणि विहंगम छायाचित्रण त्यांच्या 'महाराष्ट्र देशा' या २०१० मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकातून दिसून येते. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिकतेचा मानबिंदू असलेल्या 'पंढरपूर वारी'चे आणि ग्रामीण महाराष्ट्राचे यथार्थ छायाचित्रण त्यांच्या 'पहावा विठ्ठल' या २०११ मधील पुस्तकाच्या माध्यमातून देशालाच नव्हे तर जगाला भूरळ घातली. आपल्या छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून दुष्काळी भागातील शेतकरी आणि वन्यजीव संरक्षणासाठी निधी उभारून त्यांनी मदत केली.

## योगदान

शिवसेनेच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर शिवसेनेला अधिक सर्वसमावेशक करतानाच आधुनिकतेशी त्यांनी शिवसेनेला जोडले. युवक, कामगार आणि शेतकरी यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी राज्यभर चालविलेल्या विविध आंदोलनांना यश आले. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या धोरणाने कार्य करणाऱ्या शिवसेनेच्या समाजकारणाची दखल गिनीज बुकने घेतली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने मलेरिया आजारासाठी चाचणी आणि उपचार केंद्र सुरू करून गरजूंसाठी औषध पुरवठाही सुरू केला. मुंबईमधील आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने अनेक रूग्णालयांचे निर्माण. विविध रक्तदान महाशिबिरांच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण समाजकार्याची पायाभरणी. २००२ च्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे प्रचार प्रमुख म्हणून जबाबदारी आणि विजयाचे शिल्पकार. महाराष्ट्रात पक्षविस्तार केल्याने लोकसभा, विधानसभा निवडणुकांमध्ये शिवसेनेला यश. गेल्या पाच वर्षांपासून राज्यातील आणि केंद्रातील सरकारांमध्ये शिवसेना एक प्रमुख घटकपक्ष म्हणून सहभागी. राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाला भरघोस यश. राज्य आणि केंद्र शासनाकडून आवश्यक ती मदत न मिळाल्याने उद्धव ठाकरे यांनी २००७ मध्ये विदर्भातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी यशस्वी मोहीम राबवली. उद्धव ठाकरे यांनी शेतकरी कल्याणावर लक्ष केंद्रीत करीत आपल्या पक्षाचा विस्तार वाढविला आणि राज्यानेही त्यांचे नेतृत्व स्वीकारले. संवेदनशील लेखक, कवी, अभ्यासू आणि छायाचित्रकार असलेल्या उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या राजकारणामध्ये महत्त्वाचे बदल घडवून आणले.

# काँग्रेसचे नेते नाना पटोले बनले विधानसभा अध्यक्ष



**मुंबई :** राज्याच्या १४ व्या विधानसभा अध्यक्षपदावर महाराष्ट्र विकास आघाडीचे काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांची बिनविरोध निवड. भाजपने आपले उमेदवार किसन कथोरे यांचा अर्ज मागे घेतला. किसन कथोरे भाजपचे ठाणे जिल्ह्यातील मुरबाडचे तर नाना पटोले हे विदर्भातील भंडारा जिल्ह्यातील साकोलीचे काँग्रेस आमदार आहेत. विधानसभा अध्यक्षपद हे स्थायी व अत्यंत मानाचे असते. सभागृह चालवण्यात व कामकाज करण्यासंदर्भात अध्यक्षाची भूमिका महत्त्वाची असते.

## विदर्भाला झुकते माप

नाना पटोले १९९९ ते २०१४ पर्यंत काँग्रेस आमदार होते. २०१४ मध्ये ते भाजप खासदार झाले. आमदारकीची त्यांची चौथी टर्म आहे. सध्या ते राष्ट्रीय किसान काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. शेतकरी व कुणबी नेते असलेले पटोले हे विदर्भातील बडे नेते आहेत.

# विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड



**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी भारतीय जनता पक्षाने एकमताने पक्षाचे गटनेते देवेंद्र फडणवीस यांची नियुक्ती केली. विधानसभेच्या सत्रात अध्यक्ष नाना पटोले यांनी फडणवीस यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

भारतीय जनता पक्षाने आपणाकडे पक्षाचे विधीमंडळ पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांची विरोधी पक्षनेते म्हणून एकमताने निवड केली असल्याचे पत्र दिले, अशी माहिती पटोले यांनी सभागृहाला दिली आणि फडणवीस यांची विरोधी पक्षनेता म्हणून निवड जाहीर केली. फडणवीस यांच्या नियुक्तीनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. त्यांनी या प्रस्तावावेळी भाषणही केलं. त्यानंतर सभागृहातील सर्वपक्षीय प्रमुख नेत्यांनी फडणवीस यांचे अभिनंदन केले. 'विरोधी पक्षनेता माझा मित्रच आहे, तेव्हा दोघांमध्ये अंतर ठेवायला नको. कोणाचे वाभाडे काढण्याची आपली परंपरा नाही,' असं आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्या अभिनंदनाच्या ठरावावेळी केलं. देवेंद्र फडणवीस विधानसभेचे विरोधी पक्षनेते झाल्यानंतर उद्धव यांनी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला, त्यावेळी ते बोलत होते.



महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या नव्या सदस्य सचिव म्हणून आस्था लुथ्रा यांनी नुकतीच सूत्रे हाती घेतली आहे. त्यांचे स्वागत करताना आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर. श्रीमती लुथ्रा या भारतीय लेखा आणि हिशेब सेवेच्या (IA&AS) २००३च्या तुकडीच्या अधिकारी आहेत.

# राज्यात महिलांवरील अत्याचारावर तातडीने कारवाई करा

## निर्भया फंडाच्या त्वरित विनियोगासाठी कार्यपद्धती तयार कराः मुख्यमंत्री

**मुंबई :** राज्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रकरणात तातडीने कारवाई करा, असे आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पोलीस महासंचालक कार्यालयात राज्य पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत दिले.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस राज्याचे पोलीस महासंचालक सुबोध जयस्वाल, मुंबईचे पोलीस आयुक्त संजय बर्वे यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. महिलांवरील अत्याचारुबाबत कठोरात कठोर पावले उचलण्यात यावीत, असे सांगून मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्र पोलीस दलाच्या कामाची वाखाणणी नुकत्याच पार पडलेल्या देशातील पोलीस महासंचालकांच्या परिषदेत झाली. महिला अत्याचाराच्या प्रकरणात तात्काळ व जलद कार्यवाही करून गुन्हेगारांना वचक बसेल असे काम करावे.

पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी ज्या ज्या आवश्यक असतील त्या सर्व सुविधा शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येतील. आपल्या सरकारला खाकी वर्दीच्या आतला माणूस मजबूत करायचा आहे, असा संदेश श्री. ठाकरे यांनी पोलीस दलाला दिला.

सर्वसामान्य नागरिकाला पोलीसांविषयी आदर आणि त्याचबरोबर दरारा वाटेल अशा पद्धतीने काम करावे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, काही वेळा न्याय्य मागण्यांसाठी सर्वसामान्य नागरिक अहिंसात्मक मार्गाने रस्त्यावर उतरतात. अशा वेळी नोंदविण्यात आलेले गंभीर गुन्हे वगळता साध्या स्वरुपाचे गुन्हे काढून घेण्यासाठी सकारात्मक पावले टाकावित.

अतिशय आवश्यक असेल तेव्हाच बळाचा वापर केला पाहिजे. पोलीसांमुळे नागरिकांचे सण- उत्सव आनंदात पार पडतात, असेही गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करावेत. त्याला तात्काळ मान्यता देण्यात येईल. पोलीसांच्या घरांचे प्रश्न, आरोग्याचे प्रश्न, कर्तव्यकालावधीचे प्रश्न, कर्तव्य सहजतेने पार पाडता येतील यासाठीच्या सुधारणांसाठी प्रयत्नशील राहू.

या बैठकीत व्हीडिओ कॉन्फरन्सवर पुणे, ठाणे, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, नवी मुंबई पोलीस आयुक्तांशी तसेच परिक्षेत्रांच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. प्रारंभी श्री. जयस्वाल यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले.




# वेश्या व्यवसायासाठी शोषणाविरोधात जनजागृती

## राज्य महिला आयोगाच्या वतीने न्यायाधीशांची परिषद

साद प्रतिनिधी, मुंबई

वेश्या व्यवसायासाठी शोषणाबाबत जनजागृती सरकार वकील आणि संबंधित घटकांमध्ये जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि इंटरनॅशनल जस्टिस मिशन (आयजेएम) यांनी एक अभ्यासक्रम तयार केला आहे. मुंबईत २२ नोव्हेंबरला पार पडलेल्या न्यायाधीशांच्या परिषदेत अभ्यासक्रमाची माहिती देण्यात आली.

भारतात २०१६मध्ये मानवी तस्करीच्या १५,३७९ घटनांची नोंद झाली होती, अशी आकडेवारी राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालात देण्यात आली आहे. नोंद झालेल्या घटनांपैकी ९० टक्के घटनांमध्ये वेश्या व्यवसायाच्या हेतूनेमानवी तस्करी झाल्याचे उघड झाले आहे. यातील ११४५ घटना महाराष्ट्रातील आहेत. या पार्श्वभूमीवर आयोगाच्या अभ्यासक्रमाचे महत्त्व ध्यानात येऊ शकेल.

'वेश्या व्यवसायासाठी शोषण पीडितांचे रक्षण आणि त्यांना न्याय' (सिक्युरिंग जस्टिस अँड प्रोटेक्शन ऑफ व्हिक्टिम्स ऑफ कमर्शियल सेक्शुअल एक्स्प्लॉयटेशन) या नावाची ही परिषद होती.

''मानवी तस्करी हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा गुन्हा असून, महिला आणि मुले अधिक प्रमाणात मानवी तस्करीला बळी पडतात,'' असे सांगून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर म्हणाल्या, ''हा



अभ्यासक्रम सरकारी वकिलांसाठी तयार करण्यात आला आहे. यामध्ये सरकारी वकिलांना एकाच ठिकाणी सर्व कायदेशीर माहिती उपलब्ध होणार आहे. त्यातून पीडितांना न्याय मिळवून देणे अधिक प्रभावीपणे होऊ शकेल.''

''तंत्रज्ञानाच्या मदतीने वेश्या व्यवसायासाठी भाग पाडण्यात







आलेल्या पीडितांना जलद न्याय मिळवून देण्यात यावा,'' अशी अपेक्षा व्यक्त करतानाच राज्य महिला आयोगाने मुलींसाठी स्वरक्षणाचे वर्ग सुरू केल्याचे आणि वन स्टॉप सेंटरच्या माध्यमातून त्यांना मोफत कायदेशीर मदत मिळवून दिल्याची माहितीही दिली.

''या प्रकरणातील खटले कार्यक्षमतेने चाविण्यात यावेत, तसेच, त्यांचा निकालही सुलभपणे लागला पाहिजे,'' अशी गरज व्यक्त करून आयजेएमच्या कार्यकारी संचालक मेलिसा वालावलकर म्हणाल्या, ''या अभ्यासक्रमातून बळजबरीने वेश्या व्यवसायाविरोधातील विविध मुद्द्यांची तसेच, याबाबत उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निकालांची माहिती उपलब्ध होईल. पीडितास्नेही वातावरणात हे खटले चालण्याचे महत्त्वही अभ्यासक्रमात अधोरेखित करण्यात आले आहे.''

उद्घाटनाच्या सत्रात मुंबई उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायमूर्ती आनंद निरगुडे यांनी या विषयातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर उहापोह केला. ते म्हणाले, ''या प्रकरणांमध्ये स्त्रियांना जे भोगावे लागते, त्याची भरपाई करण्यासाठी कायद्यात पुरेशा तरतुदी नाहीत. या विषयावर तातडीने जनजागृती करण्याची गरज आहे. केवळ जनजागृतीनेच अर्धी लढाई जिंकता



येईल. अशा प्रकरणांमध्ये पोलिसांकडे नोंद होणाऱ्या घटनांचे प्रमाण अगदी मोजकेच आहे. अनेक पीडिता पाठबळाअभावी आपल्यावरील अन्यायाची वाच्यताच करीत नाहीत.''

या परिषदेला महाराष्ट्रातील वरिष्ठ जिल्हा न्यायाधीश, सरकारी वकील, देशभरातील महिला आयोगांच्या अध्यक्ष उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायमूर्ती आणि पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या परिषदेत मार्गदर्शन केले.

महिला डिजिटल साक्षरता POWER TO EMPOWER
महाराष्ट्र राज्य महिला आयोग

# राज्यातील महिला होताहेत डिजिटल साक्षर

## महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या कार्यशाळांना उत्साही प्रतिसाद

**पुणे :** बचत गटांच्या महिलांसाठी प्रशिक्षणाचा प्रज्ज्वला कार्यक्रम पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने डिजिटल साक्षरता अभियान हाती घेतले आहे. यामध्ये राज्यभरात पाचशे कार्यशाळा घेतल्या जाणार असून महिलांना, विशेषतः ग्रामीण महिलांना डिजिटल तंत्रज्ञानाची सफर घडवून आणली जाणार आहे. या कार्यशाळांपैकी धुळे, सांगली, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळांना महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागातील महिलांना या प्रवाहात पूर्णपणे समाविष्ट करणे, हा आयोगाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यशाळेत तज्ञ लोकांच्या मार्गदर्शनाखाली महिलांमध्ये डिजिटल सेवा आणि तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. प्रॅक्टिकल लर्निंगवर भर हे या कार्यशाळांचे वैशिष्ट्य आहे.

ग्रामीण भागातील महिलांना डिजिटल उपकरणांचा (स्मार्ट फोन्स) वापर, इंटरनेटचा कार्यक्षम वापर, दैनंदिन गरजेची महत्वपूर्ण अप्स (उदा. 'उमंग', 'आपले सरकार', 'ई-जीईएम', 'डिजीलॅकर', 'आयआरसीटीसी') डिजिटल पेमेन्ट (उदा. 'भीम', 'फोनपे'), सायबर सुरक्षा आदींचे प्रशिक्षण दिले जात आहे. या अभियानासाठी आयोगाने ५० प्रशिक्षकांची नेमणूक केली आहे. गेल्या काही महिन्यांत आयोगाने तीन महत्वपूर्ण उपक्रम राबविलेले आहेत. पालखी सोहळ्यांमध्ये 'वारी नारीशक्ती'ची या सॅनिटरी नॅपकिन्सच्या वापराबाबत जनजागृती, 'प्रज्वला' योजनेंतर्गत बचत गटांच्या महिलांना आर्थिक आणि कायदेशीर प्रशिक्षण आणि आता डिजिटल साक्षरता अभियान आयोजित केले जात आहे.

> "एक महिला शिकली की ती संपूर्ण घराला शिक्षित करते आणि ती आपल्या घराबरोबरच इतरही चार घरांतील महिलांना शिक्षित करते. डिजिटल साक्षरता ही काळाची गरज आहे. म्हणूनच महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम आणि स्वावलंबी करायचे असेल तर डिजिटल साक्षर करणे गरजेचे आहे. त्यासाठी आम्ही विविध स्वयंसेवी संस्था, महाविद्यालये यांच्या मदतीने राज्यभर पाचशे कार्यशाळा घेत आहोत. त्यासाठी संस्थांना अनुदानही दिलेले आहे.
>
> **विजया रहाटकर,** अध्यक्षा
> महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या



महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने महिलांना डिजिटल साक्षर बनविण्याच्या अभियानाचा प्रारंभ धुळे येथील एसव्हीकेएम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी या संस्थेमध्ये झाला. चारशेहून अधिक महिलांना हे प्रशिक्षण दिले गेले. महिलांचा मोठा प्रतिसाद हे त्याचे वैशिष्ट्य. पाच महत्त्वाचे ॲप्स महिलांनी डाऊनलोड केले गेले.






# कोल्हापुरमधील डिजिटल प्रशिक्षण अभियानाची क्षणचित्रे...








महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्यावतीने नियुक्त करण्यात आलेल्या प्रशिक्षकांनी सहभागी प्रशिक्षणार्थींना वैयक्तिक मार्गदर्शन करीत त्यांच्या शंकांचे निरसन केले. प्रशिक्षणादरम्यान उपस्थित महिलांनीही 'ॲप'ची चाचणी घेत आपली माहिती तपासून पाहिली.



## डिजिटल साक्षरता प्रशिक्षणाची औरंगाबादमधील क्षणचित्रे...










औरंगामध्ये आयोजित प्रशिक्ष कार्यशाळेत महिलांनी विविध 'ॲप' डाऊनलोड केलीच शिवाय ती वापरूनही पाहिली.

## डिजिटल साक्षरता प्रशिक्षणाची सांगलीमधील क्षणचित्रे...





*लंबी लाइनों मे खडे होकर*
*अब समय नहीं गवाना हैं,*
*डिजिटल इंडियाने*
*सबका जीवन सँवारा हैं।*





## रत्नागिरीमधील डिजिटल प्रशिक्षण अभियानाची क्षणचित्रे...











# डिजिटल साक्षरता प्रशिक्षणाची थेट गड़चिरोलीमधील क्षणचित्रे...





## एसव्हीकेएम इन्स्टीट्यूट ऑफ फार्मसीत महिला आयोगातर्फे कार्यशाळा

## महिलांसाठी डिजीटल साक्षरता कार्यशाळा

## डिजिटल प्रशिक्षण कार्यशाळा

भोकरदन : महाराष्ट्र राज्य महिला आयोग व आर्यन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था भोकरदन यांच्या वतीने २७ नोव्हेंबर रोजी रत्नमाला लॉन येथे महिलांसाठी डिजिटल प्रशिक्षण आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, रमाई यांच्या प्रतिमेस नगराध्यक्षा मंजुषाताई देशमुख, डॉ. सुनीताताई सावंत, वंदना ताई हजारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रशिक्षक राहुलजी रावकर यांनी महिलांना प्रशिक्षण दिले. डिजिटल प्रशिक्षण अभियानाच्यावतीने राज्यामध्ये ५५० डिजिटल प्रशिक्षण अभियान कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. पो.कॉ.वसुंधरा धाडेकर, डॉ. सुनीता सावंत, मालिका बोर्डे, वंदना हजारे, वैशाली दाभाडे, शिल्पा इंगळे, पो.कॉ.वसुंधरा भाडेकर, संध्या मापारी, शितल हिवाळे, माजी नगरसेविका रेखाताई दारुटे, राहुल रावकर, द्रुपदाबाई वाघ, सुनिता बोर्डे, शीतल जोगदंडे, रामविलास सूर्यवंशी, चंद्रकांत बडगुजर, राहुल इंगळे, प्रदीप जोगदंड, मंगलदीप पगारे, रमन पगारे यांच्यासह तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दरेगाव : महिलांसाठी डिजिटल साक्षरता कार्यशाळेचे आयोजन, महिलांची उपस्थिती

## महिलांनी डिजिटल साक्षर व्हावे-प्रणव पवार

लोकमत न्यूज नेटवर्क

जालना : राज्य महिला आयोग महिलांसाठी वेगवेगळ्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करत असून, महिलांनी आजच्या आधुनिक काळात साक्षर व्हावे, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाचे प्रशिक्षक प्रणव पवार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग मुंबई व क्रांतिसिंह बहुउद्देशीय सेवाभावी संस्था (दरेगाव) यांच्या संयुक्त विद्यमाने दरेगाव येथे ग्रामीण

### महिला सक्षम होणे गरजेचे

- अध्यक्षीय समारोपात एम. डी. सरोदे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले. पंचायतराज व्यवस्थेमध्ये महिलांना ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षण असून, ग्रामीण असो की, शहरी महिला ही सक्षम व्हायलाच पाहिजे, यासाठी ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली.
- महाराजस्व अभियान याव्दारे राज्यशासन प्रत्येक गावात जाऊन महिलांना त्यांचे अधिकार पटवून देत



जगभरात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात जनजागृतीसाठी १० डिसेंबर रोजी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनावर केशरी रंगाची विद्युत रोषणाई करण्यात आली होती. संयुक्त राष्ट्रांनी हाती घेतलेल्या महिलांविरोधातील हिंसा संपविण्याच्या मोहिमेचा हा एक भाग होता. यंदा संयुक्त राष्ट्रांच्या मोहिमेचे ब्रीद वाक्य : 'ऑरेंज द वर्ल्ड : जनरेशन इक्वलिटी स्टँड्स अगेन्स्ट रेप' असे आहे.

# बलात्काऱ्यांना २१ दिवसांत फाशी

## आंध्र प्रदेशात 'दिशा' कायदा लागू



**हैदराबाद :** आंध्र प्रदेश विधानसभेत शुक्रवारी दिशा विधेयक मंजूर करण्यात आले. याविधेयकानंतर बलात्कार प्रकरणात लवकरात लवकर फाशीची शिक्षा देणारे आंध्र प्रदेश देशातील पहिले राज्य बनले आहे. हैदराबादमध्ये महिला डॉक्टरवरील सामूहिक बलात्कार, खून आणि त्यानंतर तिचा मृतदेह जाळण्याच्या धक्कादायक घटनेनंतर राज्यासह संपूर्ण देशामध्ये आक्रोश होता. यानंतर आंध्र प्रदेश सरकारने हे पाऊल उचलले.

'दिशा' विधेयकाला आंध्र प्रदेश फौजदारी (दुरुस्ती) कायदा २०१९ असेही म्हटले आहे. या विधेयकांतर्गत बलात्कार आणि सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यासाठी खटला वेगाने चालवणे, २१ दिवसात निकाल देणे आणि गुन्हेगारास फाशीची शिक्षा देण्याची तरतूद आहे. तत्पूर्वी बुधवारी मंत्रिमंडळाने राज्याचे मुख्यमंत्री वाय. एस. जगन मोहन रेड्डी यांच्या नेतृत्वात दिशा विधेयक मंजूर केले. सध्याचा कायदा अशाप्रकारच्या प्रकरणांचा खटला चालवण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी मिळतो.

**कायदयात काय आहे तरतूद?**

नवीन कलम ३५४ (ई) तयार करण्यासाठी विधेयकात आयपीसीच्या कलम ३५४ मध्ये सुधारणा केली. बलात्काराच्या प्रकरणात एफआयआर नोंदविल्यानंतर २१ दिवसांच्या आत सुनावणी करण्यासह मृत्यूदंडाची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातही 'दिशा कायदा'?

## मुख्यमंत्र्यांनी मागवला अहवाल




महाराष्ट्रातही आंध्र प्रदेशप्रमाणे कठोर कायदा करून बलात्कार प्रकरणातील दोषीला २१ दिवसांत फाशी दिली जावी, असा प्रस्ताव शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी मांडला असून त्याची दखल घेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुख्य सचिवांकडून यासंदर्भात अहवाल मागितला आहे. नागपूर: महाराष्ट्रातही आंध्र प्रदेशप्रमाणे कठोर कायदा करून बलात्कार प्रकरणातील दोषीला २१ दिवसांत फाशी दिली जावी, असा प्रस्ताव शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी मांडला असून या प्रस्तावाची दखल घेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुख्य सचिवांकडून यासंदर्भात अहवाल मागितला आहे. आंध्र प्रदेश विधानसभेत 'दिशा विधेयक २०१९' मंजूर करण्यात आले असून दिशा कायद्याने महिला सुरक्षेला बळ मिळणार आहे. या कायद्यानुसार बलात्कार प्रकरणातील दोषीला २१ दिवसांत फाशी दिली जाणार आहे. त्याचा दाखला देत महाराष्ट्रातही असा कठोर कायदा करण्यात यावा, अशी विनंती सरनाईक यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तसेच गृहमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

दिशा कायद्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही कायदा करण्यासाठी आंध्र प्रदेशमधील या विधेयकाचा मसुदा मागवून घेण्यात यावा व त्यात गरज असल्यास आवश्यक असे फेरफार करून हे विधेयक हिवाळी अधिवेशनातच मंजूर करून घेण्यात यावे, असेही सरनाईक यांनी पुढे नमूद केले आहे.

ओळख कायद्याची



# ‘एनआरआय’शी विवाह : समस्या व समाधान




**महिलांविषयक कायदे विषयक जनजागृतीसाठी राज्य महिला आयोगाने ‘विधिलिखित’ (भाग २) ही पुस्तक मालिका प्रकाशित केली आहे. त्या मालिकेतील ‘एनआरआय’ विवाहविषयक समस्या, समाधान व कायदे यांची माहिती...**

**क्रमशः**

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या शिफारसी

या गंभीर विषयावर चर्चा करून त्यावर तोडगा काढण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने परदेश व्यवहार मंत्रालयाशी सहयोगाने चंदीगड व तिरुअनंतपुरममध्ये २००६मध्ये दोन कार्यशाळा घेतल्या. त्यात झालेल्या व्यापक चर्चेनंतर आयोगाने काही शिफारसी केल्या आहेत. त्या अशा :

## अ) कायदेशीर हस्तक्षेप : आंतरराष्ट्रीय

१) एनआरआय विवाहांबाबतचे तंटे सोडवण्यासाठी हेग कन्व्हेन्शनमधील कायदेशीर तरतुदींचा साकल्याने अभ्यास करून त्यावर सहमती दर्शवत त्यात सहभागी होणे. (या करारातील काही तरतुदींना अमेरिका व कॅनडानेही सहमती दर्शवली आहे.)

२) ज्या देशांत अनिवासी भारतीय किंवा भारतीय वंशाच्या नागरिकांची संख्या लक्षणीय आहे, अशा देशांबरोबर या समस्येवर तोडगा काढण्यासाठी द्विपक्षीय करारावर भर देणे. परदेशातील व्यक्तींना घटस्फोट मंजूर करणे, पोटगीचे हक्क देणे आणि मुलांचा ताबा मिळवण्याबाबत आदेश देणे आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार दिवाणी संहितेतील कलम ४४ अ, मेंटेनन्स ऑर्डर एन्फोर्समेंट अक्ट १९२१चे कलम ३ आणि दिवाणी संहितेतील कलम १३ नुसार भारतीय न्यायव्यवस्थेस आहेत. या कायद्यांच्या अनुषंगाने असे द्विपक्षीय करार करणे

३) असे करार करताना काही कळीचे मुद्दे प्राधान्याने ध्यानात घ्यावेत. ते असे

अ) न्यायालयीन प्रक्रिया अवैध ठरण्यासाठीची पार्श्वभूमी : एखाद्या देशाचे धोरण किंवा कायद्याविरुद्धच्या तरतुदी, प्रतिवादीला



न्यायालयीन कामकाजात सहभागी करून घेण्यासाठी नोटीस न बजावताच केली गेलेली न्यायालयीन कारवाई, विवाहविषयक कायदे, घटस्फोट, मुलांचा ताबा आदींबाबत संबंधित देशातील कायद्यांच्या विरोधात दिले गेलेले निकाल.

ब) फौजदारी स्वरूपाच्या खटल्यांतील साक्षीदाराच्या तपासणीचा मुद्दा

४) एनआरआय विवाहाचे तंटे कायद्याच्या कक्षेत कसे बसवायचे, असाही एक वेगळा पैलू यानिमित्ताने समोर येतो आहे. त्यासाठी वास्तव्य (डोमिसाईल), राष्ट्रीयत्व, सध्याचा अधिवास असे काही मुद्दे विचारात घेतले जावेत. त्यातही राष्ट्रीयत्व आणि डोमिसाईलमध्ये विद्यमान अधिवास हा मुद्दा संतुलन साधतो. त्यामुळे विद्यमान अधिवासावर भर दिला जावा आणि भविष्यात तयार केल्या जाणाऱ्या कायद्यांत त्याचा अंतर्भाव केला जावा.

५) विद्यमान परिस्थितीत सुधारणा होण्याच्या दृष्टीने परदेशात घेतलेल्या घटस्फोटांना मान्यता देण्यासाठी किंवा ते रद्दबातल ठरण्यासाठी त्रिसूत्री धोरण स्वीकारावे.

अ) विद्यमान कायदेशीर तरतुदींत अधिक स्पष्टता आणणे

आ) ज्या देशांत अनिवासी भारतीय किंवा भारतीय वंशाच्या नागरिकांची संख्या लक्षणीय आहे किंवा ज्या देशातील भारतीय वंशाच्या नागरिकांना दुहेरी नागरिकत्व देण्याचा विचार सरकार करत आहे, त्या देशांबरोबर यासंदर्भात द्विपक्षीय करार करण्यावर तातडीने भर द्यावा.

इ) मुलांचा ताबा हा विषय गुंतागुंतीचा असतो. मात्र, त्यातही केवळ पालकांचा विचार केला जाऊ नये. मुलांचे भवितव्य आणि हित कशात आहे, याचा साकल्याने विचार करून याबाबतच्या कायदेशीर तरतुदी केल्या जाव्यात. ऑस्ट्रेलियन कायद्यांमधील तरतुदी यादृष्टीने मार्गदर्शक ठरू शकतात. सुरक्षित वातावरणात चांगली प्रगती करणाऱ्या मुलांचा ताबा दुसऱ्या पालकाकडे देण्यासाठी न्यायालयाला सबळ कारण न सापडल्यास असा ताबा न देणे, भावंडांची ताटातूट न करणे, पालकांकडे ताबा देतानाही मुलांचे म्हणणे विचारात घेतले जावे, परिस्थितीचे योग्य भान असलेल्या पण कायदेशीरदृष्ट्या सज्ञान नसलेल्या मुलांचे मतही विचारात घेतले जावे, लहान मुले, विशेषतः मुली आईच्या देखरेखीखालीच चांगल्या पद्धतीने वाढू शकतात, त्यामुळे आईकडेच त्यांचा ताबा देणे, मुलांच्या भवितव्याचा साकल्याने विचार करून व त्यांची मते विचारात घेऊनच ताबा दिला जावा, अशा चांगल्या तरतुदी ऑस्ट्रेलियन कायद्यांत आहेत. त्यांच्या आधारे नवे कायदे बनवले जावेत.

८) गुन्हेगार हस्तांतराच्या कायद्यातील कलम २० हे एनआरआय विवाह विषयक तंट्यातही समाविष्ट करण्याबाबत विचार केला जावा

## कायदेशीर हस्तक्षेप : देशांतर्गत

१) विवाहनोंदणी बंधनकारक करणे : सीमा विरुद्ध अश्‌विनीकुमार खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात व्यापक सूचना केल्या आहेत. त्या अशा :

अ) भारतीय नागरिक, मग ते कोणत्याही जाती धर्माचे असोत, त्यांनी आपल्या राज्यात विवाहनोंदणी केलीच पाहिजे.

आ) संबंधित राज्य सरकारांनी तीन महिन्यांत विवाहनोंदणीची कार्यवाही पूर्ण केली पाहिजे.

इ) अनिवासी भारतीयाबरोबर भारतात विवाह झाल्यास अशी नोंदणी करणे संबंधित राज्य सरकारांनी बंधनकारक करावे आणि एनआरआय विवाह प्रमाणपत्र द्यावे.

२) एनआरआय विवाह तंट्यात उदभवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रागतिक दृष्टिकोनातून कायदेशीर तरतुदी केल्या जाव्यात. भारतात किंवा परदेशात केल्या गेलेल्या विवाहांची किंवा घटस्फोटांची वैधता, त्याबाबतच्या न्यायदान प्रक्रियेतील न्यायालयांच्या अधिकार कक्षा,



भारतात किंवा परदेशात पत्नीच्या अनुपस्थितीतच दिले जाणारे कायदेशीर निकाल, भारतीय व परदेशी न्यायालयांचे परस्परविरोधी निकाल, असे प्रकार टाळण्यासाठी प्रागतिक पावले टाकणे गरजेचे आहे. हुंड्याच्या मागणीसाठी किंवा अन्य कारणांसाठी पत्नी व मुलांचा छळ करणे, खोटी माहिती देऊन फसवणूक करून परदेशात फरार होणे, मुलांचा बळजबरीने ताबा मिळवणे, अशा प्रकरणांत पती किंवा सासूसासऱ्यांची भारतातील वडिलोपार्जित संपत्ती पत्नीच्या नावे करण्याबाबतही विचार केला जावा

३) आपला मुलगा परदेशात कोठे आहे याची माहिती देण्यास त्याचे पालक अनेकदा नकार देतात किंवा त्याबाबत माहिती देत नाहीत. तसेच, काही वेळा त्याच्याशी आपला संबंध नसल्याचेही सांगतात. अशा वेळी एनआरआय पत्नीस सासूसासऱ्यांच्या संपत्तीत वाटा दिला जावा. सासूसासऱ्यांची मालमत्ता किंवा संपत्ती भारतात असली आणि त्यावर मुलाचा कायदेशीर हक्क नसला, तरीही संबंधित पत्नीला अशा संपत्तीत वाटा देण्याबाबतची तरतूद कायद्यात केली जावी.

४) विवाहानंतर परदेशी गेलेल्या पत्नीशी गैरवर्तणूक करणाऱ्या पतीचा पासपोर्ट रद्द करण्यासाठी पासपोर्ट कायद्यातही सुधारणा केली जावी. अनिवासी भारतीयाच्या पासपोर्टवर पत्नीचे केवळ नाव व छायाचित्र देण्यापेक्षा तिच्याबाबतची अधिक माहिती दिली जावी. पासपोर्ट नुतनीकरण करताना चुकीची किंवा खोटी माहिती देणे हा दंडनीय गुन्हा ठरवण्याबाबतची तरतूदही या कायद्यात केली जावी.

५) एनआरआय पतीकडून पत्नीची केली जाणारी छळवणूक, पिळवणूक थांबवण्यासाठी सध्याच्या फौजदारी दंडसंहितेतील कलमांचा वापर करून संबंधितांवर कारवाईसाठी पोलिस व कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांसाठी योग्य ती नियमावली तयार करून द्यावी. पती परदेशात फरार झाल्यास किंवा त्याचे आईवडिल किंवा कुटुंबीयांनी त्याचा ठावठिकाणा सांगण्यास नकार दिल्यास त्यांची भारतातील संपत्ती जप्त केली जावी आणि फौजदारी दंडसंहितेच्या कलम २८५(३) प्रमाणे संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली जावी. तसेच, हिंदू विवाह कायद्याच्या (१९५६) कलम १८ नुसार कारवाईच्या सूचनाही संबंधित यंत्रणांना दिल्या जाव्यात.

## अन्य सरकारी हस्तक्षेप

१) विविध राज्यांमध्ये एनआरआय विवाहांची समस्या गंभीर असल्याने राज्यांमध्ये व केंद्रीय पातळीवरही या समस्यांच्या निपटाऱ्यासाठी वकिल, समुपदेशक व अन्य तज्ज्ञांचा समावेश असलेले विशेष कक्ष स्थापन केले जावेत. अशा कक्षांद्वारे पिडित महिलांना आवश्यक ती सर्व कायदेशीर मदत तत्परतेने दिली जाणे शक्य होईल.

२) अनिवासी भारतीयांची किंवा भारतीय वंशाच्या नागरिकांची लक्षणीय संख्या असलेल्या देशांतील भारतीय दुतावासांतही असे विशेष कक्ष स्थापन केले जावेत. त्यामुळे त्या देशांत राहणाऱ्या महिलांना आवश्यक सर्व मदत व माहिती देता येईल.

३) विवाहानंतर परदेशी गेलेल्या महिलांना या संदर्भातील माहिती ऑनलाइन उपलब्ध करून दिली जावी. शक्यतो सर्व भारतीय भाषांमधून ती मिळेल, याची व्यवस्था केली जावी.

४) परदेशात अडकून पडलेल्या किंवा तेथे पतीने दाखल केलेल्या कायदेशीर दाव्यात अडकून पडलेल्या महिलांच्या मदतीसाठी भारतीय दूतावास, अन्य सरकारी यंत्रणा, पोलिस व अन्य साह्यकारी यंत्रणांमध्ये समन्वय व सहकार्य वाढवावे. शक्य तेथे अशा स्वरुपाचे करारमदार केले जावेत. परदेशातील न्यायालयांत आपली बाजू मांडणे किंवा अन्य वैध कारणांसाठी परदेशी गेलेल्या पत्नीला अधिवासाच्या परवान्याची मुदत वाढवून देणे, अशाच कारणांसाठी तातडीने व्हिसा मिळवून देणे आदी बाबींत साह्यासाठीही सरकारने पुढाकार घ्यावा.

५) अशा विवाहांची झळ बसलेल्या महिला व त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक आधार देण्यासाठी विशेष समुदपेदश केंद्रे, हेल्पलाइन सुरू करणे

## ड) जगजागृती अभियान

१) एनआरआय विवाहाबाबत घ्यावयाची काळजी, भारतीय कायद्यांनुसार अशा पत्नीचे असलेले कायदेशीर अधिकार आणि पती ज्या देशात राहतो आहे, त्या देशात पत्नीस असणारे कायदेशीर अधिकार या तीन मुद्द्यांवर भारतीय समाजात जनजागृती करणे गरजेचे आहे. त्यासाठी सातत्याने जनजागृती केली गेली पाहिजे.

## खबरदारीचे उपाय

१) कोणताही निर्णय घाईगडबडीने घेऊ नये आणि कोणाच्याही कोणत्याही दबावाला बळी पडू नये

२) केवळ फोन किंवा ई मेलवरील संभाषणांमधून कोणताही अंतिम निर्णय घेतला जाऊ नये

३) कोणतीही संस्था, कक्ष, मध्यस्थ किंवा दलालावर डोळे झाकून विश्वास ठेवू नये

४) कोणत्याही खात्रीशिवाय किंवा कोणत्याही गोष्टीची खातरजमा न करता कोणत्याही कागदपत्रांवर सह्या करू नयेत किंवा कोणतेही व्यवहार करू नयेत

५) ग्रीन कार्ड किंवा नागरिकत्व किंवा अन्य तत्सम योजनांच्या प्रलोभनांना बळी पडू नये

६) कोणताही निर्णय खासगीत किंवा गुप्तता बाळगून घेऊ नका. तुमचे जवळचे नातेवाईक, मित्र किंवा हितचिंतक कदाचित तुम्हाला अशी माहिती देऊ शकतील की जी तुम्हाला माहिती नसेल. त्यामुळे अशा गंभीर विषयांबाबत तुम्ही तुमच्या जवळच्या व्यक्तींशी चर्चा करून निर्णय घ्या

७) परदेशात विवाहाच्या आमिषाला बळी पडू नका

८) रजिस्टर्ड मॅरेज किंवा दूर ठिकाणी कमी लोकांत विवाहाच्या

आमिषालाही बळी पडू नये

## मुलाची चोख माहिती घेणे गरजेचे आहे. त्याचे मुद्दे असे

१) मुलगा प्रथम वर आहे, घटस्फोटित आहे की विभक्त

२) नोकरी व्यवसाय : शिक्षण, हुद्दा, नोकरीचे ठिकाण, त्याचा पत्ता, संबंधित कंपनीविषयीची माहिती

३) इमिग्रेशनचा दर्जा : व्हिसाचा प्रकार कोणता आहे, तो पत्नीला आपल्याबरोबर परदेशात नेऊ शकतो का

४) आर्थिक परिस्थिती

५) भारतात असलेली स्थावर, जंगम मालमत्ता आणि त्याचा पत्ता

६) गुन्हेगारी पार्श्वभूमी किंवा एखाद्या गुन्ह्याशी संबंध

७) कौटुंबिक माहिती, पार्श्वभूमी

मुलाची खालील कागदपत्रे चोख पडताळावीत

१) पासपोर्ट, व्हिसा

२) मतदान ओळखपत्र किंवा तत्सम ओळखपत्र

३) सोशल सिक्युरिटी नंबर

४) मागील तीन वर्षांची प्राप्तिकर विवरणपत्रे

५) बँक खात्याचा तपशील

६) मालमत्तेची कागदपत्रे

मदतीसाठी उपयुक्त ठरणारी माहिती

१) परदेशातील भारतीय दुतावास

२) स्थानिक भारतीय मंडळे आणि त्यांचे संपर्काचे जाळे

३) स्थानिक पोलिस आणि अन्य साह्यभूत यंत्रणा

खालील बाबींची पूर्तता केलीच पाहिजे

१) विवाहनोंदणी केलीच पाहिजे

२) व्हिसा व अन्य तत्सम बाबींची कागदोपत्री पूर्तता पतीने नव्हे, तर पत्नीनेच केली पाहिजे

३) आपल्या मरायटल स्टेटसची माहिती देणारे मुलाचे अँफिडेव्हिट

४) मुलाचा व्हिसा आणि पासपोर्टबाबतची माहिती मिळवण्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करणे

कोणत्या गोष्टी कराव्यात

१) मुलगा आणि त्याच्या कुटुंबीयांशी नित्य संपर्कात राहणे

२) मुलाने आणि मुलीने विवाहपूर्वी परस्परांशी भेटून, चर्चा करून परस्परांविषयी जाणून घेणे आणि माहितीची खातरजमा करणे.

३) अशा विवाहाची माहिती सर्वांना असणे आणि समारंभपूर्वक विवाह करणे

४) अडीअडचणीच्या वेळी कोणाशी संपर्क साधायचा याची पूर्ण कल्पना असावी

५) परदेशी गेलेल्या मुलीसाठी तिथेच एखादे बँक खाते उघडून त्यात शक्य तेव्हा पैसे जमा केले जावेत. त्यामुळे अडीअडचणीला, गरज भासेल तेव्हा मुलगी त्याचा वापर करू शकेल

६) परदेशातील भारतीय दुतावास (नियुक्त असलेल्यास वेल्फेअर ऑफिसर), स्थानिक पोलिस, मित्रमैत्रिणी अशांचे फोननंबर व ई मेल अँड्रेसेस अशी माहिती मुलीला द्यावी. मुलीनेही अशी माहिती अद्ययावत ठेवावी. त्यामुळे अडचणीच्या वेळी तातडीने मदत मिळवणे शक्य होईल.

७) मुलगी राहत असलेल्या देशात तिला मिळणारे कायदेशीर हक्क व अन्य कायदेशीर बाबींची माहिती घेणे. घरगुती हिंसाचार, अन्य स्वरुपाची पिळवणूक किंवा दुर्लक्ष केले जात असल्यास त्यातून मार्ग काढण्यासाठी अशी माहिती उपयुक्त ठरते.



८) परदेशात स्वतंत्रपणे वावरण्यासाठी व्यावसायिक किंवा अन्य कौशल्ये शिकावीत. शैक्षणिक पात्रता भक्कम करावी

९) परदेशात मित्र-मैत्रिणी जोडणे, शेजाऱ्यांशी उत्तम संबंध प्रस्थापित करण्यासाठी मुलीने कायम सामाजिक भान राखले पाहिजे.

१०) एनआरआय विवाहातील समस्या, त्यातून उदभवणाऱ्या समस्या, पती व पत्नीचे कायदेशीर हक्क आदींची व्यापक माहिती समाजापर्यंत पोचण्यासाठी माध्यमांना या विषयात सहभागी करून घेणे

११) परदेशातील भारतीय दुतावासांतूनही यासाठी मदत दिली जावी. पत्नीचा छळ किंवा पिळवणूक करणाऱ्या पतीपासून पत्नीस पोलिस संरक्षण मिळवून देणे, त्याच्याविरुद्ध कायदेशीर प्रक्रिया सुरू करणे, अडीअडचणीत असलेल्या पत्नीस प्रसंगी आर्थिक मदत करणे व गरज असल्यास निवारा उपलब्ध करून देणे, परदेशात अधिवासासाठी कायमस्वरुपी किंवा दीर्घकालीन परवानगी मिळवून देणे, अशा अनेक स्तरांवर भारतीय दूतावासांकडून मदत घेतली जावी.

१२) परदेशात अडकून पडलेल्या महिलांना मायदेशी परत आणण्यासाठी, तेथे तिच्या पतीने कायदेशीर दावा दाखल केला असल्यास त्यात बाजू मांडण्यासाठी परदेशी संस्थांची मदत मिळवणे आणि भारतातही अशा महिलांना कायदेशीर सल्ला व अन्य सेवा पुरवण्यासाठी मदत उपलब्ध करून देणे.

## भारतीय न्यायालयांनी याबाबत दिलेले निकाल

१) हरमिता सिंग विरुद्ध रजत तनेजा (२००३) : विवाहानंतर अमेरिकेत पतीकडे गेलेल्या हरमिता सिंगवर तीन महिन्यांतच पतीचे घर सोडण्यासाठी दबाव आणला गेला. त्यामुळे अमेरिकेत बेघर झालेल्या हरमिता सिंगने भारतात परतून उच्च न्यायालयात पोटगीसाठी दावा दाखल केला. पती रजत तनेजाने अमेरिकेत घटस्फोटासाठी दाखल केलेल्या दाव्याची कारवाई थांबवावी, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले. तसेच, या आदेशाची प्रत संबंधित अमेरिकी न्यायालयास देण्याचे आदेशही उच्च न्यायालयाने दिले. या खटल्यात निकाल देताना उच्च न्यायालयाने काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. हरमिता सिंग विरुद्ध रजत तनेजा प्रकरणात रजत तनेजा यांना अमेरिकी न्यायालयाने घटस्फोट मंजूर केला

असला, तरी हे प्रकरण भारतीय न्यायव्यवस्थेच्या अधिकार कक्षेतील असल्याने अमेरिकी न्यायालयाने मंजूर केलेला घटस्फोट भारतात वैध मानला जाणार नाही. अमेरिकी न्यायालयाने मंजूर केलेल्या घटस्फोटांना भारतीय कायद्यांनुसार जोपर्यंत मान्यता मिळत नाही, तोपर्यंत आरोपी द्विभार्या प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींनुसार भारतात दोषीच मानला जईल आणि त्यानुसार त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मूभा संबंधितांना असेल. हरमिता सिंग यांचे अमेरिकेतील वास्तव्य अगदीच अल्पकाळ व जुजबी स्वरुपाचे होते. अमेरिकी न्यायालयात दावा लढण्यासाठी त्या आर्थिकदृष्ट्या सक्षमही नसल्याने दिल्लीतील न्यायालयांमध्येच हा दावा चालवला जावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले होते.

२) विकास अगरवाल विरुद्ध अनुभा (२००२) : अनुभा यांनी दाखल केलेल्या पोटगीच्या दाव्यात उच्च न्यायालयाने विकास अगरवाल यांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश वारंवार दिल्यानंतरही ते न्यायालयात उपस्थित राहिले नाहीत. पत्नीने दाखल केलेल्या दाव्यात भादंविच्या कलम ४९८ अ कलमाखाली आपल्याला अटक केली जाईल, अशी भीती असल्याने आपण व्यक्तिशः न्यायालयापुढे हजर राहू शकत नाही. त्यामुळे न्यायालयाने आपल्याला तशी मुभा द्यावी, अशी विनंती अगरवाल यांनी न्यायालयास केली होती. उच्च न्यायालयाने ही विनंती फेटाळून लावली. या विरोधात अगरवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. एखाद्या खटल्यात एखाद्या किंवा काही मुद्द्यांवर स्पष्टीकरण मागण्याचे अधिकार न्यायालयांना आहेत. त्यानुसारच दिल्ली उच्च न्यायालयाने व्यक्तिशः न्यायालयात उपस्थित राहण्याचे दिलेले आदेश वैध आहेत. त्यामुळे अगरवाल यांनी उच्च न्यायालयात उपस्थित राहावे, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

३) वेंकट पेरुमल विरुद्ध आंध्र प्रदेश सरकार : वेंकट पेरुमल या अनिवासी भारतीयाच्या पत्नीने हैदराबादेत फौजदारी दंडसंहितेच्या कलम ४९८ (अ) कलमान्वये घरगुती हिंसाचाराचा गुन्हा दाखल केला. मद्रास व अमेरिकेतील अल्पकाळाच्या वास्तव्यात पतीने आपला छळ केला, तसेच गर्भपात करण्यासाठी दबाव आणला. त्याला नकार देताच अमेरिकेत डल्लास विमानतळावरच त्याने आपल्याला कफल्लक अवस्थेत सोडून दिले, असा या पत्नीचा आरोप होता. अमेरिकेतील नातेवाईकांच्या मदतीने आपण भारतात परतल्याचेही तिने न्यायालयाला सांगितले. हा दावा रद्दबातल केला जावा, अशी मागणी पेरुमल यांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात केली.

घरगुती हिंसाचार, मानसिक छळ ही सततची प्रक्रिया आहे. पेरुमल यांची पत्नी हैदराबादेत आपल्या आईवडिलांकडे राहत असतानाही तिला पतीच्या मानसिक छळास सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे ४९८ (अ) कलमानुसार दाखल केलेला दावा रद्दबातल करता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले.

पेरूमल यांच्या पत्नीच्या तक्रारीवरून हैदराबाद पोलिसांनी प्राथमिक चौकशी अहवाल (एफआयआर) दाखल करून घेतला होता. याच दरम्यान पेरुमल यांनी अमेरिकी न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता आणि पेरुमल यांना अमेरिकेत घटस्फोटही मिळाला होता. तथापि, तत्पूर्वीच हैदराबादेत एफआयआर दाखल झाला असल्याने अमेरिकी न्यायालयाच्या घटस्फोटाच्या आदेशाचे महत्त्व राहत नसल्याचे सांगत उच्च न्यायालयाने पेरुमल यांचा अर्ज रद्दबातल ठरवला होता.

४) नीरजा सराफ विरुद्ध जयंत सराफ (१९९४) : अमेरिकेत नोकरी करणाऱ्या सॉफ्टवेअर अभियंत्याशी नीरजा यांचा विवाह झाला. त्यानंतर त्या पतीकडे अमेरिकेत जाण्यासाठी व्हिसा मिळवण्याची खटपट करत असतानाच पती जयंत यांनी अमेरिकी न्यायालयात घटस्फोटाची मागणी करणारा अर्ज दाखल केला. भारतात नोकरी करणाऱ्या नीरजा यांनी विवाहानंतर अमेरिकेत जाण्याच्या हेतूने भारतातील नोकरीही सोडली होती. मात्र, अचानकच पतीने ही नोटीस दिल्याने त्या अडचणीत आल्या.

नीरजा सराफ यांनी भरपाईची मागणी करणारा दावा न्यायालयात केला. त्यावर नीरजा यांना २२ लाखांची भरपाई देण्याचा आदेश न्यायालयाने दिला. जयंत सराफ यांनी याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेत भरपाईस स्थगिती देण्याची मागणी केली. या खटल्याचा निकाल लागेपर्यंत भरपाईची कारवाई स्थगित ठेवण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले. मात्र, न्यायालयात एक लाख रुपये जमा करण्याचे आदेश जयंत यांना दिले. नीरजा यांनी याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर नीरजा यांच्या बाजूने निकाल देत उच्च न्यायालयात तीन लाख रुपये जमा करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने जयंत यांना दिले. अशा खटल्यांत पत्नीस भरपाई मिळू शकते, हेच या खटल्याच्या निमित्ताने पुढे आले.

या खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने मांडलेली काही निरीक्षणे अत्यंत महत्त्वाची आहेत.

अशा महिलांचे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी एखादा कायदा केला जाणे आवश्यक आहे. तसा तो करताना खालील काही मुद्द्यांचा त्यात अंतर्भाव केला जाणे गरजेचे आहे.

अ) एखादी भारतीय महिला आणि अनिवासी भारतीय पुरुषाचा भारतात झालेला विवाह परदेशी न्यायालये अवैध ठरवू शकत नाहीत किंवा तो रद्दबातलही करू शकत नाहीत.

आ) पतीच्या भारतातील व परदेशातील संपत्तीत पत्नीलाही योग्य वाटा मिळावा, यासाठीची तरतूद केली गेली पाहिजे.

इ) भारतीय न्यायालयांनी दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी परदेशी न्यायालयांतूनही व्हावी आणि याउलटही, यासाठी संबंधित देशांशी आवश्यक ते करार केले गेले पाहिजेत.

५) राजीव तयाल विरुद्ध भारत सरकार (२००५) : भारतीय न्यायालयांनी बजावलेल्या समन्सना कोणताही प्रतिसाद न देणाऱ्या अनिवासी भारतीय पतीचा पासपोर्ट पत्नी रद्दबातल करू शकते, हे या खटल्याच्या निमित्ताने समोर आले.

अमेरिकेत राहणाऱ्या पतीविरुद्ध पत्नीने भारतातील महानगर न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात दावा दाखल केला होता. या दाव्याच्या सुनावणीसाठी न्यायालयाने अनिवासी भारतीय पतीला वारंवार समन्स बजावले. मात्र, त्याला पतीने प्रतिसाद दिला नाही. आपण अमेरिकेत राहत असून, या दाव्यासाठी वारंवार भारतात येणे आपल्यावर अन्यायकारक ठरणार असल्याचे त्याचे म्हणणे होते. समन्सला प्रतिसाद न दिल्याने न्यायालयाने त्याला फरार घोषित केले. त्यानंतर परराष्ट्र मंत्रालयाच्या सूचनेवरून न्यूयॉर्कमधील कॉन्सूलेट जनरल कार्यालयाने पतीचा पासपोर्ट जप्त केला. या कारवाईविरोधात पतीने न्यायालयात धाव घेत या कारवाईला आक्षेप घेणारा रिट दाखल केला. आपल्याला कोणतेही समन्स न बजावताच ही कारवाई केली गेली आहे, असा त्याचा दावा होता. तसेच, पत्नीने दाखल केलेल्या दाव्याच्या तपासणीसाठी आपल्याला प्रश्नावली पाठवली जावी, अशीही त्याची मागणी होती.

केवळ परदेशी राहत असल्याच्या कारणावरून कोणालाही

अशा स्वरुपाची सवलत देता येणार नाही. त्यामुळे कोणत्याही भारतीय नागरिकापेक्षा आपण अधिक कोणी (सुपिरियर) आहोत, असा अनिवासी भारतीयांचा समज होऊ शकेल. तसेच, परदेशी राहण्याचे निमित्त पुढे करून ते कायद्यांचा दुरुपयोगही करू शकतील. त्यातून भारतीय न्यायसंस्थेच्या मूलभूत तत्वांनाच हरताळ फासला जाईल, असे सांगत न्यायालयाने पतीची ही मागणी फेटाळून लावली.

६) मागरिट पुलंपरंपील विरुद्ध चाको पुलंपरंपील (१९७०) : एनआरआय विवाह प्रकरणी मुलांचा ताबा कोणाकडे द्यायचा हा प्रश्न भारतीय न्यायालयांपुढे मोठ्या प्रमाणात येण्यापूर्वीचा हा खटला आहे. अशा प्रकरणात मुलांचा ताबा कोणाकडे द्यायचा हे ठरवण्याचा अधिकार न्यायालयांना कसा आहे आणि पती किंवा पत्नीपैकी एखाद्या पालकाने अनधिकाराने मुलाचा ताबा मिळवला असेल, तर मुलांचा ताबा मिळवण्यासाठी हेबियस कॉर्पसचाही वापर होऊ शकतो, हेही केरळ उच्च न्यायालयाच्या याबाबतच्या निकालाने दाखवून दिले आहे.

या खटल्यात मुलांची आई जर्मनीत राहत होती. मुलांना जर्मनीत आईकडे पाठवून देण्यास केरळ उच्च न्यायालयाने मंजुरी दिली. ही मुले जर्मनीत जाणार म्हणजे भारतीय कायद्यांच्या अधिकार कक्षेबाहेर जाणार, हे स्पष्ट होते. तरीही त्यांचे हित आणि त्यांच्या भावनिक व मानसिक गरजेस सर्वोच्च प्राथमिकता देत न्यायालयाने हा आदेश दिला. त्याच वेळी न्यायालय सांगेल त्यावेळी मुलांना न्यायालयापुढे हजर करण्याचे बंधन न्यायालयाने घातले. भारतीय न्यायालयाने दिलेल्या आदेशांची जर्मनीत अंमलबजावणी व्हावी, यासाठी मद्रासमधील जर्मन कॉन्सुलेटने मदत करावी, असे आदेशही न्यायालयाने दिले. मुलांची प्रगती व प्रकृतीबाबतची माहिती वेळोवेळी न्यायालयाला दिली जावी. तसेच, आईने मुलांना पश्चिम जर्मनीबाहेर कोठेही घेऊन जाऊ नये. आईने राहते घर बदलल्यास नवा पत्ता तातडीने न्यायालयाच्या रजिस्ट्रार कार्यालयास कळवावा, तीन वर्षांत एकदा आईने मुलांना स्वखर्चाने भारतात आणावे. त्यावेळी वडिलांना मुलांना न्यायालयाच्या आदेशानुसार व सूचनांनुसार भेटता येईल. वडिलांना जर्मनीत जाऊन भेटण्याची इच्छा असल्यास, तशी पूर्वसूचना न्यायालयास द्यावी आणि न्यायालयाच्या आदेशानंतरच मुलांना भेटावे, तीन वर्षानंतर मुलांच्या ताब्याबाबत न्यायालय अंतिम निर्णय घेईल, असे केरळ उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले होते.

७) सुरिंदरकौर संधू विरुद्ध हरबक्षसिंग संधू (१९८४) : सुरिंदरकौर इंग्लंडमध्ये राहत होत्या आणि तेथील न्यायालयाने मुलांचा ताबा सुरिंदरकौर यांच्याकडेच देण्याचे आदेश दिले असतानाही हरबक्षसिंग संधू मुलांना भारतात आपल्या आईवडिलांकडे बळजबरीने घेऊन आले होते. या प्रकरणात मुलांचे हित कशात आहे, या एकाच गोष्टीचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने मुलांचा ताबा आईकडे देण्याचा निकाल दिला.

८) एलिझाबेथ दिनशॉ विरुद्ध अरविंद एम. दिनशॉ (१९८६) : संधू प्रकरणासारखेच हे प्रकरण होते. दिनशॉ कुटुंब अमेरिकेत राहत होते. मुलांचा ताबा एलिझाबेथ यांच्याकडे देण्याचे आदेश अमेरिकी न्यायालयाने दिले होते. त्यानंतरही अरविंद दिनशॉ मुलांना घेऊन भारतात आले होते. अमेरिकी न्यायालयाने दिलेला निकाल आणि मुलांचे हित या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने मुलांचा ताबा एलिझाबेथ यांच्याकडे देण्याचे आदेश दिले.

९) कुलवंत संधू विरुद्ध छनन सिंग (१९८९) : कुलवंत संधू व छनन सिंग कॅनडात राहत होते. मात्र, छनन सिंग मुलांना घेऊन भारतात आपल्या घरी परतले होते. सर्वोच्च न्यायालयाने मुलांच्या हिताचा विचार करून मुलांचा ताबा आईकडे सोपवत मुलांना कॅनडास घेऊन जाण्याची परवानगी दिली.

१०) धनवंती जोशी विरुद्ध माधव उंडे (१९९८) : अमेरिकेत राहणाऱ्या अनिवासी भारतीय पतीने तिकडे पहिले लग्न केले होते. मात्र, त्याची कोणतीच माहिती न देता भारतात धनवंती जोशी यांच्याशी लग्न केले. धनवंती यांना या विवाहातून एक मुलगाही झाला. हा मुलगा अवघा ३५ दिवसांचा असताना त्याला घेऊन धनवंती जोशी भारतात परतल्या. त्यानंतर हा मुलगा १२ वर्षांचा झाल्यानंतर त्याच्या ताब्याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. मुलाचा ताबा पतीकडे दिला जावा, असा आदेश अमेरिकी न्यायालयाने दिला होता. मात्र, धनवंती जोशी यांनी मुलाला बारा वर्षे स्वतंत्रपणे व समर्थपणे वाढवले आहे, ही बाब अधोरेखित करत सर्वोच्च न्यायालयाने मुलाचा ताबा धनवंती जोशी यांच्याकडेच दिला.

११) सरिता शर्मा विरुद्ध सुशील शर्मा (२०००) : सुशील शर्मा यांनी अमेरिकेत घटस्फोटाचा अर्ज दाखल केला होता. तसेच, मुलांचा ताबा मिळवण्यासाठी पत्नी पत्नीत कायदेशीर लढाई सुरू होती. अशातच पत्नी मुलांना घेऊन भारतात निघून आली. आपली परवानगी न घेताच पत्नी मुलांसह भारतात परत गेल्याचा पतीचा आरोप होता. याबाबत सुशील शर्मा यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली असता उच्च न्यायालयाने सरिता शर्मा यांना दोन्ही मुलांचा ताबा सुशील शर्मा यांच्याकडे देण्याचे, तसेच या मुलांचे पासपोर्टही पतीकडे सुपूर्द करण्याचे आदेश दिले.

सरिता शर्मा यांनी या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. सुशील शर्मा अमेरिकेत आपल्या वृद्ध आईसह राहतात. त्यांच्या काही वाईट सवयी आणि वृद्ध मातेची जबाबदारी लक्षात घेता ते या दोन्ही मुलांचा योग्य पद्धतीने सांभाळ करू शकणार नाहीत. मुलीचे संगोपन आईच चांगले करू शकते. तसेच, भावंडांची ताटातूट करणेही योग्य नाही. त्यामुळे परदेशी न्यायालयाने जरी मुलांचा ताबा सुशील शर्मा यांच्याकडे देण्याचा आदेश दिला असला, तरी या सर्व बाबी लक्षात घेता मुलांचे हित लक्षात घेऊन मुलांचा ताबा आईकडेच राहावा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला.

वीणा कालिया विरुद्ध जितेंदर एन. कालिया (१९९६) : जितेंदर एन. कालिया यांनी कॅनडातील न्यायालयाकडून पत्नीच्या अनुपस्थितीतच घटस्फोट मिळवला. दिल्ली उच्च न्यायालयात याबाबत पत्नीने धाव घेतली. पतीने पत्नीच्या अनुपस्थितीत परदेशी न्यायालयाकडून घटस्फोट मिळवला असला, तरी भारतात पत्नीला पोटगीसाठी अर्ज करण्यापासून पती रोखू शकत नाही, असे दिल्ली उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्टपणे नमूद केले.

पतीने कॅनडात दाखल केलेल्या घटस्फोटाच्या दाव्याच्या सुनावणीस पत्नी का उपस्थित राहू शकली नाही, याचाही उच्च न्यायालयाने साकल्याने विचार केला. तेथे जाण्यापासून ते न्यायालयीन कारवाईसाठीचा व अन्य खर्च पत्नीला झेपणे शक्य नसल्याने ती तेथे उपस्थित राहू शकणार नाही, याची कल्पना असल्यानेच पतीने पत्नीच्या या असहायतेचा गैरफायदा घेत परदेशी न्यायालयात घटस्फोटाचा अर्ज दाखल केला. त्यामुळेही पत्नीचे न्याय्य हक्क डावलले गेले आहेत. तसेच, पत्नीबरोबर राहणे अशक्य असल्याचे कारण पतीने दिले असले, तरी भारतीय कायद्यांनुसार केवळ अशा कारणासाठी घटस्फोट देता येणार नाही, असेही न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले.

अनुभा विरुद्ध विकास अगरवाल खटलाही या दृष्टीने

अभ्यासण्याजोगा आहे. या दोघांचे लग्न हिंदू पद्धतीने झाले होते. लग्नानंतर अल्पकाळातच पतीने अमेरिकी न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. तसेच, या न्यायालयीन कामकाजात ती सहभागीही झाली नव्हती आणि अमेरिकी कायद्यांच्या अधिकार कक्षेतही ती नव्हती. असे असताना या घटस्फोटास मान्यता द्यायची का, असा प्रश्न भारतीय न्यायालयापुढे होता.

लग्नांतर अल्पावधीतच आपल्याला पतीपासून वेगळे राहावे लागले असून, अमेरिकेत पतीकडे जाण्यासही पतीने मज्जाव केला आहे. अशा स्थितीत आपल्याला पतीकडून पोटगी मिळावी, अशी पत्नीची मागणी होती. अमेरिकी न्यायालयात पती घटस्फोटाचा अर्ज दाखल करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळताच पतीने भारतीय न्यायालयात धाव घेत पतीला असा अर्ज करण्यापासून रोखण्याची मागणी केली. त्यानुसार भारतीय न्यायालयाने पतीला तसे आदेश बजावले. भारतीय न्यायालयाचे आदेश धुडकावून पतीने अमेरिकी न्यायालयात घटस्फोटाचा अर्ज दाखल केलाच. भारतीय न्यायालयाच्या निदर्शनास ही बाब आणून देताच न्यायालयाने पतीला दिवाणी दंडसंहितेच्या कलम १० नुसार आपले म्हणणे मांडण्याचे आदेश दिले. तेही पतीने धुडकावल्याने न्यायालयाने पतीविरुद्ध न्यायालयाच्या अवमानाची कारवाई करण्याचे आदेश दिले. याच काळात पतीने अमेरिकी न्यायालयाकडून घटस्फोट मिळवला. भारतीय न्यायालयात हा खटला प्रलंबित असतानाच अमेरिकी न्यायालयाने दिलेल्या याच खटल्याच्या निकालाची अंमलबजावणी करता येते का, असा प्रश्न यामुळे उपस्थित झाला.

या खटल्यातील वादी प्रतिवादी हिंदू आहेत. हिंदू रितीरिवाजांनुसारच त्यांचे लग्न झाले आहे. साहजिकच त्यांचा विवाह हिंदू विवाह कायद्याच्या अधिकार कक्षेत येत अशल्याने पत्नीला अमेरिकी कायदे लागूच होत नसल्याने आणि तिच्या संमतीविना व अनुपस्थितीतच पतीने अमेरिकी न्यायालयातून घटस्फोट मिळवल्याने तो भारतीय कायद्यांनुसार वैध ठरत नाही आणि त्यामुळेच संबंधित आदेशाची अंमलबजावणी करण्याची गरज नाही, असे भारतीय न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले.

बालसुब्रमण्यम गुहा विरुद्ध टी हेमप्रिया (२००५) खटल्यातही अशीच बाब दिसून आली. स्कॉटलंडमध्ये राहणाऱ्या पतीने पत्नीच्या अनुपस्थितीतच तेथील न्यायालयाकडून घटस्फोट मिळवला. भारतात राहणाऱ्या पत्नीने याबाबत मद्रास उच्च न्यायालयात धाव घेत या घटस्फोटाच्या आदेशाला आव्हान दिले. आपल्या संमतीविना व अनुपस्थितीत पतीने परदेशी न्यायालयाकडून मिळवलेला घटस्फोट बेकायदेशीर असल्याने या आदेशाची अंमलबजावणी केली जाऊ नये, असे पत्नीचे म्हणणे होते.

यावर निकाल देताना मद्रास उच्च न्यायालयाने दिवाणी दंडसंहितेच्या कलम १३चा आधार घेत हा आदेश अवैध असल्याचे स्पष्ट केले. पत्नी भारतात असताना परदेशात घटस्फोटाबाबतच्या खटल्याची सुनावणी झाली आहे. पत्नीची संमती नसताना व तिच्या अनुपस्थितीत दिला गेलेला निकाल म्हणूनच अवैध असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

भारतीय न्यायालयांच्या अधिकार कक्षेचा मुद्दा यानिमित्ताने वारंवार पुढे येत असून, न्यायालयांनी तो यथार्थपणे हाताळल्याचे विविध खटल्यांतून दिसून आले आहे.

जागीर कौर विरुद्ध जयवंतसिंग या १९६३ मधील खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल अभ्यासण्यासारखा आहे. जागीर कौर ही जयवंतसिंग यांची पहिली पत्नी. लग्नानंतर जसवंतसिंग आफ्रिकेत गेले. तिकडे ते सुमारे सात वर्षे राहिले. त्यानंतर सुमारे सहा महिन्यांच्या सुटीसाठी ते भारतात परतले आणि लुधियानातील आपल्या आईवडिलांच्या घरात राहिले. याच काळात त्यांनी दुसरे लग्न केले आणि सुटी संपल्यानंतर ते दुसऱ्या पत्नीला घेऊन आफ्रिकेत गेले. पुन्हा पाच सहा वर्षांनी ते सुटीसाठी भारतात परतले आणि पहिली पत्नी जागीर कौर यांनाही घेऊन ते आफ्रिकेत परतले. तेथे जागीर यांना जसवंतसिंग यांच्यापासून मुलगी झाली. त्यानंतर जागीर व जसवंत यांच्यात वाद होत गेले आणि ते विकोपाला गेल्यानंतर जसवंतसिंग यांनी जागीर कौर यांना भारतात पाठवून दिले. जागीर कौर यांना पैसे पाठवून देण्याचे दिलेले आश्वासन त्यांनी पाळले नाही. १९६० मध्ये जसवंतसिंग भारतात परतले आणि लुधियानात राहू लागले. पती आपली व आपल्या मुलीची देखभाल करत नाही, कोणतीही विचारपूस करत नाही. त्यामुळे पतीने आपल्याला पोटगी द्यावी, अशी मागणी करणारा अर्ज जागीर कौर यांनी कलम ४८८ नुसार लुधियाना न्यायालयात दाखल केला.

हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले असता, लुधियाना न्यायालयाच्या अधिकार कक्षेत हा खटला येतो का, असा प्रश्न उपस्थित झाला. कलम ४८८ (८) मधील काही शब्दांवरून न्यायालयात व्यापक चर्चा झाली. या कलमातील शब्दांचे तांत्रिक अर्थ काढण्यापेक्षा त्यातून काय सूचित केले जात आहे, यालाही महत्त्व दिले जावे. पत्नी किंवा अपत्यास किंवा दोघांनाही असहाय स्थितीत सोडून दुसऱ्या जिल्ह्यात किंवा परदेशात गेलेला पती काही काळाने पुन्हा त्याच किंवा शेजारच्या जिल्ह्यात परतला. तेथे तो दीर्घकाळ किंवा अगदी अल्पकाळ राहिला, तरी त्या काळात पत्नी पतीविरुद्ध ४८८ कलमानुसार दावा दाखल करू शकते. एवढेच नव्हे, तर पत्नीला टाकून गेलेल्या पतीचा कायमचा ठावठिकाणा नसेल आणि तो सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असेल, तरीही पत्नी अशा पतीविरुद्ध याच कलमाखाली दावा दाखल करू शकते. तसेच, अत्यंत अकल्पनीयरित्या व योगायोगाने अशा पतीची भेट झाली, तरीही पत्नी पतीविरुद्ध याच कलमाखाली दावा दाखल करू शकते, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले.

या खटल्यातील प्रतिवादी पती लुधियानातील खेड्यातील आपल्या घरी परतला होता आणि तेथे तो आपल्या पत्नीसमवेत सहा महिने राहिला होता. दुसऱ्या वेळी तो पत्नीला परत नेण्याच्या हेतूने अल्पकाळासाठी आला होता. त्यातून प्रतिवादी पतीने पत्नीबरोबर लुधियानात वास्तव्य केले होते, हे स्पष्ट होते. त्यामुळेच लुधियाना न्यायालयास या खटल्याची सुनावणी घेण्याचा पूर्ण अधिकार असल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

मागरिट पुलंपरंपील आणि डॉ. चाको पुलपरंपील खटल्यातही असाच कायदेशीर पेच होता. पत्नी ज्या देशातील न्यायालयांत कायदेशीर कारवाईसाठी धाव घेते आहे, त्या देशाशी तिचा वास्तवात आणि पूरक (रिअल अँड सबस्टँशियल) असा काही संबंध आहे का, याचा विचार केरळ उच्च न्यायालयाने केला. तसेच, पत्नी किंवा पती/ वडिलांच्या अधिवासाचा मुद्दा अग्राह्य ठरवत मुलांच्या हितास सर्वोच्च प्राधान्य देत निकाल दिला.

वैद्यकीय शिक्षणासाठी जर्मनीस गेले असताना चाको यांचा परिचय मागरिट यांच्याशी झाला आणि त्यांनी तेथेच लग्न केले. त्यांना दोन मुलेही झाली. त्यानंतर दोघांत झालेल्या वादामुळे मागरिट यांनी जर्मन न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला. जर्मन न्यायालयाने तो फेटाळला.

मागरिट यांनी या निकालाला वरिष्ठ जर्मन न्यायालयात आव्हान देणारा अर्ज दाखल केला. या खटल्याचा निकाल लागेपर्यंत मुलांच्या देखभालीसाठी मागरिट यांना पैसे देण्याचा आदेश जर्मन न्यायालयाने चाको यांना दिला. या खटल्याची सुनावणी प्रलंबित असतानाच एके दिवशी चाको मुलांना घेऊन भारतात परतले. त्यावेळी त्यांचे एक मूल अडीच वर्षांचे, तर दुसरे दहा महिन्यांचे होते. मुलांना भारतात घेऊन जात असल्याची कोणतीही पूर्वसूचना किंवा माहिती चाको यांनी मागरिट यांना दिली नाही.

आपल्या मुलांचा ठावठिकाणा लागत नसल्याने मागरिट यांनी पुन्हा न्यायायात धाव घेत मुलांचा ताबा मिळण्याची मागणी केली. त्यावर कोणतीच कारवाई झाली नाही. दरम्यानच्या काळात मागरिट आपल्या मुलांचा ठावठिकाणा शोधण्यात मग्न होत्या. काही काळाने मागरिट यांच्या अपिलाची सुनावणी झाली. त्यात त्यांचा घटस्फोटाचा अर्ज मंजूर करण्यात आला. तसेच, मुलांच्या देखभालीसाठी पैसे देण्याचे चाको यांना दिलेले आदेशही जर्मन न्यायालयाने एका आदेशाद्वारे रद्दबातल ठरवले. त्याचदिवशी अन्य एका जर्मन न्यायालयाने मुलांचा ताबा मागरिट यांच्याकडे सोपवण्याचा आदेश दिला. मागरिट यांनी भारतात येऊन मुलांचा ताबा मिळावा म्हणून हेबियस कॉर्पसनुसार अर्ज दाखल केला.

वडिलांचे वास्तव्याचे ठिकाण भारत, तर आईचे जर्मनी आहे, हे केरळ उच्च न्यायालयाने मान्य केले. त्याचवेळी, लग्नानंतर पतीचे वास्तव्याचे ठिकाण हेच पत्नीचे ठिकाण मानले जावे, असे प्रायव्हेट इंटरनॅशनल लॉनुसारही मान्य केले गेलेले तत्व आहे. या खटल्यात मागरिट व त्यांच्या मुलांचे हे ठिकाण भारतच असल्याने भारतीय कायद्यांच्या अधिकार कक्षेत हे कुटुंब येते, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. त्याचवेळी पत्नीने ज्या देशात घटस्फोटाचा अर्ज दाखल केला आहे, त्या देशाशी तिचे वास्तवात आणि पूरक असे घनिष्ट संबंध आहेत. म्हणून त्याच तत्वांनुसार मागरिट यांच्या घटस्फोटाच्या आणि मुलांचा ताबा मागण्याच्या अर्जावर निकाल देण्याचे अधिकार त्या देशातील न्यायालयास आहेत, असे केरळ उच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले.

नरसिंह राव विरुद्ध वेंकट लक्ष्मी (१९९१) : या खटल्यातही न्यायालयाच्या अधिकार कक्षेबाबचे प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले होते. अमेरिकेतील मिसुरी राज्यातील सेंट लुई कौंटीतील सर्किट कोर्टाने तीन मुद्द्यांच्या आधारे नरसिंह राव यांना घटस्फोट मंजूर केला होता. या दोघांत तडजोडीची शक्यता राहिलेली नाही, ९० दिवसांपेक्षा अधिक काळ नरसिंह राव मिसुरीत वास्तव्यास होते आणि त्यांच्या पत्नीने अमेरिकी न्यायालयाची अधिकार कक्षा मान्य केली नव्हती, अशी ही तीन कारणे होती.

वेंकट लक्ष्मी यांना मिसुरीतील न्यायालयाचा हा निकाल मान्य नव्हता. त्यामुळेच भारतीय न्यायालयात धाव घेऊन त्यांनी पोटगीची मागणी केली. वेंकट लक्ष्मी यांनी दाखल केलेल्या दाव्यात भारतीय न्यायालयाने मिसुरीतील संबंधित न्यायालयाचा आदेश अवैध ठरवला होता. तसा आदेश देताना न्यायालयाने सत्या विरुद्ध तेजा खटल्यातील आदेशाचा आधार दिला होता.

याबाबत भारतीय न्यायालयात सत्या विरुद्ध तेजा या महत्त्वाच्या खटल्यात झालेल्या सुनावणीत कलम १३वर उहापोह झाला होता. त्याचा सारांश असा

कलम १३ अ मध्ये असे म्हटले आहे, की परदेशी निकालपत्र हे सक्षम अधिकार कक्षा असलेल्या न्यायालयाने दिलेले नसेल, तर त्यास भारतात मान्यता मिळणार नाही. आमच्या मते या वाक्याचा अर्थ असा आहे, की ज्या कायद्याखाली पक्षकारांचे लग्न झाले असेल, तो कायदा जर असे परदेशी न्यायालय सक्षम म्हणून ओळखत असेल किंवा त्याला मान्यता देत असेल, तरच असे न्यायालय हे सक्षम अधिकार कक्षा असलेले न्यायालय म्हणता येईल. तसेच, दोन्ही पक्षकारांनी स्वेच्छेने अशा परकीय न्यायालयाच्या अधिकार कक्षेस स्वाधीन केल्याशिवाय तशा न्यायालयास सक्षम अधिकार कक्षा असलेले न्यायालय म्हणता येणार नाही. भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ४१ मधील सक्षम न्यायालय याचाही अर्थ तसाच घ्यायला हवा.

पक्षकारांनी ज्या कायद्यांना अनुसरून विवाह केला आहे, त्याच कायद्यांच्या अनुषंगाने परदेशी न्यायालयांनी अधिकार कक्षा गृहित धरायला हवी आणि निकाल किंवा दिलासा देतानाही अशाच कायद्यांना अनुसरून दिला पाहिजे. या नियमास न्यायालयाने स्वतःच तीन अपवाद नमूद केले आहेत.

१) पक्षकारांनी ज्या कायद्याखाली लग्न केले आहे, असा कायदा संबंधित परदेशी न्यायालयासमोर येतो आणि पक्षकार तेथे कारणवश किंवा दीर्घकाळ स्वेच्छेने वास्तव्यास आहेत, तसेच पक्षकारांनी मागितलेला निकाल किंवा दिलासा हा मूळ कायद्यानुसार देण्याजोगा आहे.

२) जेव्हा प्रतिवादी स्वेच्छेने संबंधित परदेशी न्यायालयाच्या अधिकार कक्षेस वर उल्लेख केल्याप्रमाणे स्वाधीन होतो आणि असा दावा गुणदोषांवर चालल्यानंतर, निकाल वा दिलासा मूळ कायद्यानुसार देण्याजोगा आहे.

३) जेव्हा प्रतिवादी परदेशी न्यायालयाच्या अधिकार कक्षा नसतानाही असा दिलासा देण्यास स्वेच्छेने संमती देतो.

ज्या कायद्यांच्या आधारे आपला विवाह झाला आहे, त्यानुसार आपल्याला नेमके कोणते अधिकार आहेत आणि कोणती बंधने आहेत याची माहिती पक्षकारांना असलीच पाहिजे. नागरिकत्व, अधिवास (डोमिसाईल), अप्ल किंवा दीर्घ वास्तव्य, अशा कारणांचा आश्रय घेऊन विवाहानंतर संबंदित कायद्यालाच पक्षकारांना बगल देता येणार नाही. नरसिंह राव व वेंकट लक्ष्मी यांचा विवाह परदेशी कायद्यानुसार झाला नव्हता, तर हिंदू विवाह कायद्यानुसार झाला होता. त्यामुळे नरसिंह राव यांना घटस्फोट मंजूर करण्याचा आदेश देणे हे परदेशी न्यायालयाच्या अधिकार कक्षेत येत नाही. तसेच, हिंदू विवाह कायद्यातील तरतुदी लक्षात घेताही त्यांचा दावा मंजूर करता येणार नाही. आपल्या राज्यात नव्वद दिवस किंवा त्यापेक्षा अधिक काळ राहणाऱ्यांना असा दावा दाखल करण्याचे अधिकार त्या राज्यातील कायद्याने दिले आहेत. याचाच आधार घेत पतीने आपण मिसुरीचे रहिवासी असल्याचे म्हणणे न्यायालयात मांडले होते. तथापि, त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता, ते तेथे अगदीच अल्पकाळासाठी आणि मिसुरीतील कायद्याची पूर्तता करून घटस्फोट मंजूर करून घेण्यासाठीच गेल्याचे दिसून येते. मिसुरीतील कायद्यातील तरतुदीत रहिवास हा मुद्दा आहे.तथापि, तात्पुरत्या स्वरुपाचा रहिलास असा त्याचा अर्थ नसून, तिथे वारंवार जाऊन राहणारे किंवा भविष्यातही जे तिथे राहणार आहेत, असा आहे. त्यामुळेही पतीची मागणी मान्य करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सुरिंदर कौर संधू विरुद्ध हरबक्षसिंग संधू (१९८४) : या खटल्यातही न्यायालयाने भारतीय न्यायालयांच्या अधिकार कक्षांबाबत स्पष्ट शब्दांत मत नोंदवले आहे. सुरिंदर कौर इंग्लंडमध्ये राहत होत्या आणि तेथील न्यायालयातून त्यांनी मुलांचा मिळवला होता. मात्र, त्यांचे पती हरबक्षसिंग संधू मुलांना जबरदस्तीने आपल्याबरोबर भारतात घेऊन

आले होते. तसेच, इंग्लंडमधील न्यायालयाने दिलेला निकाल अमान्य करत त्यांनी बारतातील न्यायालयात धाव घेत मुलांचा ताबा आपल्यालाच मिळावा, अशी मागणी केली होती. एखादी घटना कोठे घडली आहे आणि तेथील न्यायालयाने कोणत्या अधिकार कक्षेत त्यावर निकाल दिला आहे, याचाही विचार अशा खटल्यांमध्ये केला जाणे आवश्यक आहे. तसा विचार न करता सरसकट अन्य न्यायालयांच्या अदिकार कक्षांना आव्हान देण्याची मूभा दिली गेली, तर त्यातून फोरम शॉपिंगसारखे प्रकार सुरू होतील, असे स्पष्ट करत न्यायालयाने हरबक्षसिंग यांचा दावा रद्दबातल ठरवला. या दोघांचा विवाह इंग्लंडमध्येच झाला असून, तेथेच मुलांचा जन्म झाला आहे. त्यामुळे तेथील न्यायालयाने मुलांचा ताबा आईकडे देण्याचा इंग्लंडमधील न्यायालयाचा निर्णय योग्य आहे. तसेच,त्यातच मुलांचेही हित आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

सुदिप्ता बॅनर्जी विरुद्ध दीपक बॅनर्जी (१९८७) : अमेरिकेत राहणाऱ्या पतीकडून पोटगीसाठी पत्नीने कलम १२५ नुसार भारतीय न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यासच पतीने आव्हान दिले होते. आपण अमेरिकेचे नागरिक असून, लग्नानंतर पत्नीचे नागरिकत्वही आपोआपच अमेरिकन झाले आहे. त्यामुळे भारतीय न्यायालयास हा दावा चालवण्याचा अधिकार नाही, असा दावा पतीने केला होता. इंटरनॅशनल प्रायव्हेट लॉच्या विरुद्ध ही सुनावणी असल्याचेही त्याचे म्हणणे होते. मात्र, भारतीय न्यायालयाने हा दावा खोडून काढला. दोन वेगवेगळ्या कायद्यांमध्येच संघर्षाची परिस्थिती उदभवली, तर इंटरनॅशनल प्रायव्हेट लॉची तत्वे तांत्रिकपणे न स्वीकारता अशा खटल्यात भारतीय कायद्यांनुसारच सुनावणी घेतली जावी. याबाबत पतीने घेतलेले आक्षेप अनाठायी आहेत. कलम १२५ व १२६ मागे काही सामाजिक हेतू आहेत. पत्नी भारताची रहिवासी असल्याने, या कलमांमागचा हेतू लक्षात घेऊन, पत्नीच्या या कलमांखालील दाव्याची सुनावणी घेण्याचा अधिकार भारतीय न्यायालयांना आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सोंडूर रजनी विरुद्ध सोंडूर गोपाल (२००५) : पत्नीने हिंदू विवाह कायद्याच्या कलम १० नुसार पतीपासून विभक्त होणे, मुलांचा ताबा आणि देखभालीचा खर्च, यासाठी मुंबईच्या न्यायालयात अर्ज दाखल केला. पती पत्नीने स्वीडनचे नागरिकत्व घेतले असून, त्यांचा अधिवास (डोमिसाईल) भारतीय नसल्याने भारतातील कुटुंब न्यायालयास पत्नीच्या दाव्यावर सुनावणी घेण्याचा अधिकार नसल्याचा आक्षेप पतीने घेतला आणि याच मुद्द्यावर हा दावा रद्दबातल ठरवण्याची मागणी केली. पती पत्नीने स्वीडनचे नागरिकत्व घेतल्यानंतर ते लगेचच ऑस्ट्रेलियात गेले. तसेच, स्वीडनचे नागरिकत्व स्वीकारले असले, तरी दोघांचा मूळ अधिवास (डोमिसाईल) भारतच असून, ते कोणालाही नाकारता येणार नाही. पतीने स्वीडनचे नागरिकत्व घेतल्याचा मुद्दा वादासाठी मान्य केला, तरी आपण आपले डोमिसाईल कधीही बदलेले नसून, ते भारतीयच आहे, असे पत्नीने न्यायालयास सांगितले. स्वीडनचे डोमिसाईल स्वीकारल्यानंतर दोघे जण लगेचच ऑस्ट्रेलियात गेल्याने स्वीडिश डोमिसाईल आपोआपच संपुष्टात येते. पर्यायाने त्यांचे मूळचे भारतीय डोमिसाईल कायम राहते. त्यामुळे हा दावा भारतीय न्यायालयांच्या अधिकार कक्षेत येतो. पर्यायाने मुंबईतील कौटुंबिक न्यायालयाच्या अधिकार कक्षेत येतो. त्यामुळेच भारतीय न्यायालयास व मुंबईतील कौटुंबिक न्यायालयास या दाव्याची सुनावणी घेण्याचा अधिकार असल्याचे पत्नीचे म्हणणे होते. तसेच, हिंदू विवाह कायद्यानुसार या दाव्याची सुनावणी झाल्यानंतर नागरिकत्व, वासतव्य किंवा तत्सम कोणत्याही कारणांनी ती मध्येच थांबवण्याचे कारण नाही. त्यामुळे पतीने उपस्थित केलेला नागरिकत्व व वास्तव्याचा (डोमिसाईल) मुद्दा गैरलागू आहे. नागरिकत्व व वास्तव्य हे दोन वेगळे मुद्दे आहेत. स्वीडनचे नागरिकत्व घेतले याचा अर्थ वास्तव्यही तिथेच आहे, असा होत नाही. हिंदू विवाह कायद्याच्या कलम १९ चाही उल्लेख पत्नीने आपल्या दाव्यात केला होता आणि या कलमात डोमिसाईलबाबत कोणताच उल्लेख नसल्याकडेही न्यायालयाचे लक्ष वेधले होते. पती ज्या ठिकाणी जाईल तिकडे हिंदूधर्मीय पत्नीला जावे लागते. त्यामुळे हिंदू विवाह कायद्याच्या अंमलबाजावणीसाठी डोमिसाईलची अट घातली गेल्यास, हिंदूधर्मिय पत्नींसाठी ती फारच जाचक ठरेल आणि त्यातून गंभीर स्वरुपाची सामाजिक समस्या निर्माण होईल, असे म्हणणेही सोंडूर रजनी यांनी न्यायालयापुढे मांडले. वादासाठी, डोमिसाईलचा मुद्दा महत्त्वाचा मानला, तरी तो केव्हापासून ग्राह्य धरला जावा याचाही निर्णय झाला पहिजे. ज्या दिवशी दावा दाखल केला त्या तारखेस नव्हे, तर ज्या दिवशी विवाह झाला त्या तारखेस डोमिसाईल कोणते होते, याचा विचार केला जावा. मॅरेज लॉज (अमेंडमेंट) अॅक्ट २००३ नुसार कौटुंबिक न्यायालयांनाही अशा दाव्यांची सुनावणी घेण्याचे अधिकार देण्यात आल्याचेही सोंडूर रजनी यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

न्यायालयाने सोंडूर राजन यांचे म्हणणे ग्राह्य मानले. अशा दाव्यांमध्ये पत्नीला भरपाई मिळावी आणि तिचे जीवन सुसह्य व्हावे, या हेतूनेच मॅरेज लॉज अॅक्टमध्ये सुधारणा केल्या गेल्या आहेत. केवळ वास्तव्याच्या मुद्द्यावरून पत्नीला भरपाई नाकारणे योग्य ठरणारे नाही. हिंदू विवाह कायद्याच्या कलम १९ मध्ये वास्तव्याचा मुद्दा नमूद असला, तरी वास्तव्याबाबत स्पष्टपणे कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे पत्नी सध्या जिथे वास्तव्यास आहे, तेथे ती दावा दाखल करू शकते. वास्तव्य आणि डोमिसाईल या दोन मुद्द्यांमुळेच असे दावे भारतीय न्यायालयांच्या अधिकार कक्षेत येवू शकतात, हे हिंदू विवाह कायद्याच्या कलम १, २ व १९ चा समग्रपणे अभ्यास केल्यास स्पष्ट होईल. पत्नीच्या आईवडिलांच्या वास्तव्याच्या ठिकाणीही असा दावा दाखल करण्याचे अधिकार पत्नीस आहेत, असे स्पष्ट करत न्यायालयाने कलम १९च्या उपकलम (३ अ) नुसार मुंबईच्या कौटुंबिक न्यायालयाच्या अधिकार कक्षेत हा दावा येत असल्याचा निकाल दिला.

या दाव्यातील पक्षकारांचा विवाह हिंदू वैदिक पद्धतीने झाला होता आणि हिंदू विवाह कायद्यानुसारच त्याची नोंदणी झाली होती. त्यामुळे जोपर्यंत हा विवाह अस्तित्वात आहे, तोपर्यंत हा कायदाही बंधनकारक राहील आणि याच कायद्यातील तरतुदींनुसार पक्षकार विभक्त होऊ शकतील, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

एनआरआय विवाहांमधील डोमिसाईल ही समस्या गंभीर आहे. नोकरी, व्यवसाय किंवा अन्य कोणत्याही कारणांनी पती वेळोवेळी वास्तव्याचे ठिकाण (डोमिसाईल) बदलत राहतो. त्यामुळे पिडित पत्नींना न्याय मिळण्यात अडचणी येतात. भारतीय न्यायव्यवस्थेने त्याचाही खोलवर विचार केला असून, पिडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक तरतुदी केल्या आहेत. भारतीय आणि इंग्लिश प्रायव्हेट इंटरनॅशनल लॉची डोमिसाईलबाबत चार प्रमुख तत्वे आहेत. कुठेच वास्तव्य (डोमिसाईल) नाही, असा माणूसच नाही, एकाच व्यक्तीचे एकाच वेळी दोन ठिकाणी वास्तव्य असू शकत नाही, भौगोलिक सीमांतील कायद्यांचे बंधन त्याला असतेच आणि वर्तमानात त्याचे जिथे वास्तव्य असते तेथील कायदेच त्याला लागू होतात. एनआरआय विवाहांतील तंटे व समस्या लक्षात विद्यमान व भविष्यातील परिस्थिती लक्षात घेऊन अधिक व्यापक

तरतुदी करण्याची गरज न्यायालयांनीही व्यक्त केली आहेच आणि तशी संधीही आहे.

परदेशातील भारतीय महिलांना मदतीसाठी भारतीय दुतावास किंवा कार्यालयांशी संलग्न असलेल्या भारतीय महिला संघटना, भारतीयांच्या संघटना व बिगर सरकारी संघटनांची (एनजीओ) माहिती अशी :

## कार्यालयाचे ठिकाण

भारतीय दूतावास, वॉशिंग्टन डी. सी. आशा (एशियन वूमन्स सेल्फ हेल्प असोसिएशन) पोस्ट बॉक्स २०८४, रॉकव्हिले एम.डी. २०८२७/२०८४

**कॉन्स्युलेट जनरल ऑफ इंडिया, सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया**

१) एमएआयआरआय, २३४, ईस्ट गिश रोड, सुट २००, सान जोस, कॅलिफोर्निया ९५११२
२) नारिका (एनएआरआयकेए), पोस्ट बॉक्स नं. १४०१४, बर्ले, कॅलिफोर्निया ९४७१४
३) एसईव्हीए लीगल एड ३७०५३, चेरी स्ट्रीट, २०७, नेवार्क, कॅलिफोर्निया ९४५६० ई मेल : **anuworldwideibs.com**

**कॉन्स्युलेट जनरल ऑफ इंडिया, न्यूयॉर्क**

१) सखी, न्यूयॉर्क, सखी फॉर साऊथ एशियन वुमेन, न्यूयॉर्क, पोस्ट बॉक्स २०२०८, न्यूयॉर्क, एनवाय १०००१ (२१२) ७१४..९१५३
२) एडब्ल्यूएकेई (एशियन वुमन्स अलयान्स फॉर किनशीप अँड इक्वॅलिटी). एडब्ल्यूएकेई, १३० नॉर्थ मेन स्ट्रीट, न्यू सिटी, न्यूयॉर्क १०९५६ ई मेल : **awakeallawakealliance.org**
३) मानवी, न्यूजर्सी, मानवी आयएनसी, पी. ओ. बॉक्स ३१०३, न्यू ब्रून्सवीक, एनजे ०८९०३. ई मेल : **manavimanavi.org**
४) सेवा (सर्व्हिस अँड एज्युकेशन फॉर वुमेन अगेन्स्ट अब्युज), फिलाडेल्फिया, सेवा, पी ओ बॉक्स १५९१ हॅवर्टन, पीए १९०८३ ई मेल : **sewaapagmail.com**
५) इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बफेलो, ८६४, डेलावेअर अव्हेन्यू, बफेलो, न्यूयॉर्क, १४२०९ ई मेल : **iibiibuff.org**
६) एशियन वुमेन्स सेफ्टी नेट, यूएस हायवे, १ साऊथ, सूट १०६, प्रिन्स्टन, एनजे, ०८५४० ई मेल : **infoasianwomenssafetynet.com**
७) स्नेहा आयएनसी, पोस्ट बॉक्स नं. २७१६५०, वेस्ट हार्टफोर्ड, सीटी ०६१२७

**कॉन्स्युलेट जनरल ऑफ इंडिया, शिकागो**

- अपना घर आयएनसी (अवर होम), ४७५३, नॉर्थ ब्रॉडवे, सूट ६३२, शिकागो, आयएल ६०६४०, ई मेल : **infoapnaghar.org**
- कॉन्स्युलेट जनरल ऑफ इंडिया, ह्युस्टन दया आयएनसी, ५८९० पॉइंट वेस्ट डॉ., ह्यूस्टन टीएक्स ७७०३६

**भारतीय दुतावास, दोहा, कतार**

- इंडियन कम्युनिटी बेनेव्हेलंटफंड (आयसीबीएफ), पी ओ बॉक्स २७८८, दोहा (कतार)

**भारतीय उच्चायुक्त, कॅनबेरा, ऑस्ट्रेलिया**

- फेडरेशन ऑफ इंडियन कम्युनिटीज ऑफ क्वीन्सलँड आयएनसी (एफआयसीक्यू), ब्रिस्बेन, पी ओ बॉक्स १५७, स्प्रिंग हिल, क्यूएलडी ४०६९

**कॉन्स्यूलेट जनरल ऑफ इंडिया, मेलबर्न, ऑस्ट्रेलिया**

१) द इंडियन वेल्फेअर अँडरिसोअर्स सेंटर (आयडब्ल्यूआरसी), द वेल्फेअर विंग ऑफ फेडरेशन ऑफ इंडियन असोसिएशन ऑफ व्हिक्टोरिया, मेलबर्न
२) फेडरेशन ऑफ इंडियन असोसिएशन्स ऑफ व्हिक्टोरिया आयएनसी (एफआयएव्ही), पी ओबॉक्स ६९६, ग्लेन वेव्हर्ली, व्हीआयसी, ३१५०, ३/८५, फोस्टर स्ट्रीट, डेंडेनाँग व्हीआयसी ३१७५ ई मेल : **presidentfiav.asn.au**

**कॉन्स्यूलेट जनरल ऑफ इंडिया, सिडनी, ऑस्ट्रेलिया**

- युनायटेड इंडियन असोसिएशन आयएनसी, पोस्ट बॉक्स ५७५, स्ट्राथफिल्ड,एनएसडब्ल्यू २१३५

**भारतीय उच्चायुक्त, ओटावा, कॅनडा**

१) इंडियन कॅनडा असोसिएशन १३०१ प्रेस्टन ड्राईव्ह, ओटावा, ओएन केआयई, २ झेड २
२) ओटावा कम्युनिटी इमिग्रंट सर्व्हिसेस ऑर्गनायझेशन, ९५९ वेलिंग्टन स्ट्रीट, ओटावा ओएन केआयई, २ एक्स ५
३) नॅशनल असोसिएशन ऑफ कॅनेडियन्स ऑफ इंडियन ओरिजिन, २४ सेंट पॉल स्ट्रीट, स्यूट २०१, माँट्रियल क्यूसी एच २ वाय १ जी ३
४) एडब्ल्यूआयसी, कम्युनिटी अँड सोशल सर्व्हिसेस ३०३० डॉन मिल्स रोड, प्युआँट प्लाझा, नॉर्थ यॉर्क, ओएन एम२जे ३सी१

**भारतीय दूतावास, बहारिन**

- मायग्रंट वर्कर्स प्रोटेक्शन सोसायटी (एमडब्ल्यूपीएस) पी ओ बॉक्स ५५६१, प्लॉट नं. २ , ग्राउंड फ्लोअर, बिल्डिंग ६४७, रोड ३६२५, अँडलिया एरिया ३२६, किंग्डम ऑफ बहारिन

**भारतीय दूतावास, वेलिंग्टन, न्यूझीलंड**

- शक्ती कम्युनिटी कौन्सिल आयएनसी, ५ए, जॉर्डन अँव्हेन्यू, ओंचुंगा, ऑकलंड, पी ओ बॉक्स २४४४८, रॉयल ओक, ऑकलंड ई मेल : **sccshakti.org.nz**

**भारतीय उच्चायुक्त, लंडन, ब्रिटन**

१) गूड ह्युमन फाऊंडेशन, ४२ इटन हाऊस, ३९..४० अपर ग्रॉसव्हेनॉर स्ट्रीट, लंडन डब्ल्यू १ के २एनजी
२) संगम असोसिएशन ऑफ एशियन वुमेन, २१० ब्रंट ओक ब्रॉडवे, एजवेअर, मिडलसेक्स, एचए८ ओएपी, ब्रिटन ई मेल : **infosangamcentre.org.uk**

**समाप्त**



# घरगुती औषधे : कारले



**कारले कडू असले तरी अनेक असाध्य रोगांवर औषध म्हणून याचा वापर चांगला होतो. जास्त करून मधुमेहावरील औषध असा याचा उल्लेख केला जातो. कारले हे उष्ण, कडू असले तरी पित्त वाढवत नाही.**



**डॉ. राजेंद्र कंटक,**
१३, दौलत कॉलनी, मार्केट यार्ड, कऱ्हाड, जि. सातारा, ९८८१४४३२४३

बहुतांश जणांना न आवडणारे व स्वतः कडू असून, नुसत्या चवीने मनुष्याच्या चेहऱ्यावर कडू भाव आणणारे द्रव्य म्हणजे कारले. कारली दोन प्रकारची असतात. एक आपण नेहमी बघतो ते आणि दुसरे आकाराने दोन ते तीन इंच फणसासारखे दिसणारे रान कारले किंवा फागल किंवा कारटूल. कारले जरी कडू असले तरी अनेक असाध्य रोगांवर औषध म्हणून याचा वापर चांगला होतो. जास्त करून मधुमेहावरील औषध असा याचा उल्लेख केला जातो. कारले हे उष्ण, कडू असले तरी पित्त वाढवत नाही. अनेक जणांचा असा समज आहे की, ते पित्तकारक आहे; पण योग्य प्रमाणात सेवन केले असता पित्ताशयातील अशुद्ध पित्त जठरात आणून कारले त्याची शुद्धी करते, मात्र पित्ताचा उष्ण गुण वाढवत नाही.

कारल्याचा कडू आस्वाद घेणाऱ्या व्यक्ती खूपच कमी आहेत. अनेकांना कारले तर खावयाचे असते मात्र ते कडू लागता कामा नये अशी

इच्छा असते. अशा वेळी कारल्याची भाजी कडू लागू नये म्हणून त्यात मसाल्याचे पदार्थ, लसूण, कांदा इत्यादी घालून भाजी करतात. जेणेकरून कारले सेवन केल्याचे समाधान मिळते. अनेकदा कारल्याच्या भाजीत मसाल्याचे पदार्थ, शेंगदाण्याचे कूट इत्यादी घातले की, मसाल्याच्या पदार्थांत कारल्याच्या फोडी टाकल्या हे समजणे कठीण जाते. मसालेदार पदार्थ घालून कारल्याची चमचमीत भाजी केल्यावर पित्त वाढणारच, कारण कारले पित्ताच्या स्त्रवण्यास मदत करते. जठरात आलेल्या पित्ताचा व मसालेदार पदार्थांचा संयोग होऊन पित्ताचा उष्ण आणि तीक्ष्ण गुण वाढतो. म्हणजेच पित्त वाटले असा आपला समज होतो. कारल्याचा चांगला गुण येण्यासाठी त्याच एकच सेवन करावे किंवा चवीला तिखट मीठ लावून तव्यावर परतून घ्यावे. कारल्याच्या सेवनानंतर आंबट ताक, लिंबू खाऊ नये. जास्त प्रमाणात कारल्याच्या सेवनाने काही त्रास झालाच तर तुपाचे सेवन करावे. (फक्त चमचाभर)

कारल्यात भूक वाढवण्याची ताकद आहे, तसेच कृमिनाशक व पित्ताचे खडे फोडण्याचा गुण आहे. मधुमेही रुग्णांमध्ये शरीरातील इन्सुलिनचा स्राव वाढवून रक्तात रक्तातील साखर कमी करण्यास कारले मदत करते. शरीरात असणाऱ्या अग्न्याशयावर कारल्याची प्रक्रिया होऊन इन्सुलिनची निर्मिती नेहमीपेक्षा जास्त होते, म्हणजेच अग्न्याशयावर कारले कार्य करते. कारले रक्तशुद्धी करत असल्याने त्वचाविकारात याचा चांगला उपयोग होतो. तसेच, अंगावर कोणत्याही प्रकारची सूज आल्यास कारल्याच्या रसाच्या सेवनाने कमी होते. अंगाची आग होत असेल तर कारल्याचा रस लावल्यानेही आग कमी होते, असा अनुभव आहे. पित्त वाढून अंगाची आग होत असेल, अंगावर गांधी उठल्या असतील तर मात्र बाह्योपचाराने याचा उपयोग होत नाही. सतत अंगावर पित्त उठण्याचा इतिहास असेल तर रसाच्या अभ्यंतर सेवनाने चांगला उपशय मिळाल्याची उदाहरणे आहेत. महत्त्वाची लक्षात ठेवायची गोष्ट म्हणजे तिखट, तेलकट जास्त खाण्याने पित्त वाढले तर मात्र कारल्याचे सेवन करू नये. यकृताच्या व्याधीतही यकृताचे कार्य सुधारण्यासाठी कारले चांगल्या प्रकारे मदत करते. पित्ताचे खडे निर्माण होऊन झालेल्या काविळीत कारल्याचा चांगला उपयोग होतो. या ठिकाणी पित्ताच्या प्रवाहात अडथळा आणणाऱ्या खड्यांचे भेदन होते व पित्ताचे स्त्रवण योग्य होते. त्याबरोबरच शरीरात पसरलेल्या अशुद्ध तिच्यातही त्याबरोबरच शरीरात पसरलेल्या अशुद्ध पित्ताचेही (अल्ब्युमिन) हरण होते, मात्र अन्य कारणांनी निर्माण झालेल्या काविळीवर याचा उपयोग वैद्यकीय सल्ल्याने करणे आवश्यक आहे. यकृताच्या व्याधीत यकृतावर पडणारा ताण कारल्याच्या रसाने कमी होतो. यकृताच्या ठिकाणी असणाऱ्या रंजक पित्ताचे कार्यही चांगले होण्यास मदत झाल्याने रक्ताची शुद्धी होते व रक्ताच्या अशुद्ध त्यामुळे काही त्वचाविकार निर्माण असल्यास तोही बरा होतो.

स्त्रियांच्या मासिक पाळीच्या वेळी अंगावरून पांढरे जात असल्यास किंवा मासिक पाळी अनियमित असल्यास कार्यालयाचे मिठाबरोबर सेवन करावे. मात्र, अंगात रक्त कमी झाल्याने (ॲनिमिया) पाळीचा त्रास होत असल्यास कारल्याचा उपयोग टाळणे हितकारक ठरते. तसेच, गर्भाशयाचा काही आजार असल्यास याचा उपयोग होत नाही.

बाळंतपणानंतर मूला अंगावरचे दूध पिते, तेव्हा दुधात काही दोष असेल तर तो कारल्याच्या सेवनाने दूर होतो. कारल्याने दूध वाढत नाही किंवा कमी होत नाही. तसेच मुलावरदेखील याचा वाईट परिणाम होत नाही.

तारुण्यात चेहऱ्यावर येणाऱ्या पीटिका (पिंपल्स) कारल्याच्या रसाच्या सेवनाने कमी होतात तसेच कारल्याच्या जोडीला अन्य औषधांच्या जोडीने
हे काळे डाग हे जाण्यास मदत होते. अन्य द्रव्ये प्रकृतीनुसार असल्यामुळे त्यांचा इथे उहापोह केलेला नाही.

आहाराखेरीज अन्य कारणाने पित्त वाढून डोके जड होणे, दुखणे करपट ढेकर इत्यादी लक्षणे असल्यासही कारल्याचा उपयोग चांगला करता येतो. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी कोथिंबिरीबरोबर कारल्याचा वापर करावा. कारण याच्या सेवनाने खाल्लेला आहार योग्य पचण्यास मदत तर होते पण त्याचबरोबर भूक वाढण्यासही मदत होते. म्हणूनच कारल्याच्या हंगामात रोज जेवणामध्ये कारले कच्चेच खाण्याने फायदा होतो. कारल्याच्या ऋतूमध्ये आपल्याला भूक लागत नाही, पचन योग्य होत नाही. कृमींच्या आजाराची शक्यता असते, म्हणूनच परमेश्वराने या कारल्यासारख्या द्रव्याची निर्मिती केली आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होऊ नये. कारल्याचा हृदयविकारावरही चांगला उपयोग होताना दिसून आले आहे. हृदयविकाराच्या प्रकारानुसार तसेच शरीरप्रकृतीनुसार त्याचे कार्य व्यवस्थित होण्यासाठी वैद्यकीय सल्ल्याने याचे सेवन करावे. छातीत कफ साठवून खोकला अथवा लागत असल्यास कारल्याचा रस दोन चमचे मध, एक चमचा व आल्याचा रस एक चमचा घेतल्याने आराम मिळतो कोरडा खोकला आल्यास किंवा रात्री खोकल्याचे प्रमाण जास्त असल्यास नुसता कारल्याचा रस सेवन करावा.





# जिम्नॅस्टिकमधील नवे आशास्थान 'मेघना रेड्डी' !



**रिदमीक जिम्नॅस्टिक प्रकारात तेलंगणाची मेघना रेड्डी दीपाचा वारसा पुढे नेण्यासाठी सज्ज झाली आहे. २०२० साली जपानमध्ये होणाऱ्या 'टोकियो ऑलिंपिक' मध्ये भारताला दीपा बरोबरच मेघनाकडूनही पदकाची आशा निर्माण झाली आहे.**

अमित मधुकर डोंगरे, amitdongre10@gmail.com

भारतीय जिम्नॅस्टिकला जागतिक स्तरावर ओळख व मान देण्याचे काम दीपा कर्माकरने केले आता रिदमीक जिम्नॅस्टिक प्रकारात तेलंगणाची मेघना रेड्डी दीपाचा वारसा पुढे नेण्यासाठी सज्ज झाली आहे. २०२० साली जपानमध्ये होणाऱ्या 'टोकियो ऑलिंपिक' मध्ये भारताला दीपा बरोबरच मेघनाकडूनही पदकाची आशा निर्माण झाली आहे ती तिची गेल्या तीन वर्षातील कामगिरी पाहून.

२०१६ च्या रिओ ऑलिंपिकमध्ये व्हॉल्ट प्रकारात दीपाला ब्राँझ पदकाने जरी हुलकावणी दिली असली तरी 'प्रोदुनोव्हा व्हॉल्ट' वरील तिच्या वर्चस्वाची चर्चा चांगलीच रंगली होती, तिच्याकडून प्रेरणा घेत मेघनाने रिदमीक प्रकारात सहभागी होण्याचा विडा उचलला आणि आपल्या सरस कामगिरीने तिने जाणकारांना तिची दखल घेणे भाग पाडले. तिच्या कामगिरीत असेच सातत्य राहीले तर टोकियोत तिने पदक मिळवले

तरी कोणाला आश्चर्य वाटणार नाही. त्यासाठी ऑलिंपिक स्पर्धेपूर्वी तिला सरावासाठी भरपूर स्पर्धा खेळायच्या आहेत. त्यात विश्वविजेतेपद स्पर्धा आहे, आत्ता सुरू होणारी राष्ट्रकुल स्पर्धा आहे, शिवाय सप्टेंबरमध्ये होणारी आशियाई स्पर्धा आहे. यातील एका स्पर्धेत जरी तिने पदक मिळवले तरी तिला टोकियो ऑलिंपिक कोटा मिळेल.

दीपा कर्माकर प्रमाणेच आत्ताच केवळ १९व्या वर्षी मेघना भारतीय जिम्नॅस्टिकची 'पोस्टर गर्ल' बनली आहे. राष्ट्रकुल स्पर्धेच्या पात्रता फेरीच्या सामन्यात तिने केलेली कामगिरी थक्क करणारी आहे. राजधानी दिल्लीत झालेल्या पात्रता फेरीच्या स्पर्धेत मेघनाने ५४ गुणांची नोंद केली. २०१४ साली झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेतील विजेतीलाही इतकेच गुण मिळाले होते व पदक देखील. त्यामुळे मेघनाचा प्रवास योग्य दिशेने सुरू आहे. तिने गेल्या तीन मोसमांत जितक्या स्पर्धा खेळल्या त्यात पन्नास पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत ही कामगिरी ऑलिंपिक पदक मिळवणाऱ्या खेळाडूंच्या जवळपास जाणारी ठरली आहे त्यामुळेच भारताला जिम्नॅस्टिकमध्ये मेघनाकडून ऑलिंपिक पदकाची आशा आहे.

## 'प्रशिक्षकांनाही विश्वास

दीपा कर्माकरचे जे प्रशिक्षक आहेत तेच विश्वेश्वर नंदी आणि जयप्रकाश चक्रवर्ती मेघनाचे देखील प्रशिक्षक आहेत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली मेघना सध्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी कसून सराव करत आहे. या शिवाय ती दरवर्षी किमान सहा महिने ओहिओ येथे माजी ऑलिंपिक खेळाडू वाखरा फीलोयूकडे सराव करते. तिच्या प्रशिक्षकांना मेघनाच्या ऑलिंपिक यशाची खात्री आहे. वयाच्या अकराव्या वर्षी तिने या खेळाला सुरूवात केली आणि आज ती राष्ट्रकुल स्पर्धेत वयाच्या केवळ १९ व्या वर्षी सहभाग घेत आहे इतकी तिची कामगिरी सरस आहे.

केरळमध्ये २०१५ साली झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिने एक सुवर्ण आणि एक ब्राँझपदकाची कमाई केली. त्याचवर्षी बुडापेस्ट येथील स्पर्धेतही सहभागी झाली होती मात्र त्यात तिला पदकाविनाच परतावे लागले. २०१६च्या आठव्या वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत तिच्या कामगिरीचा जोरावर तिला 'पीपल्स चॉइस' पुरस्कार देखील मिळाला. वयाच्या सतराव्या वर्षी तिने वरिष्ठ स्पर्धेत विजेतेपद पटकावले तेव्हाच विश्वेश्वर नंदी यांनी तिला उज्ज्वल भविष्य असल्याचे म्हणले होते, आज तेच तिचे प्रशिक्षक आहेत.

इंग्लंडमधील अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या बाथ करंडक स्पर्धेत तिने ब्राँझ पदकाची कमाई केली आणि त्याच वेळी जागतिक स्तरावर प्रथमच तिचे नाव झळकले. त्यानंतर ती जिम्नॅस्टिकच्या आधुनिक सरावासाठी तीन महिने युक्रेनला गेली आणि क्लब अंतर्गत स्पर्धांमध्ये तिने मानांकित खेळाडूंनाही मागे टाकत आपला दबदबा प्रस्थापित केला. बाथ करंडक स्पर्धेनंतर तिने लंडन चषकातही ब्राँझ पदकाची कमाई केली. त्यानंतर इटलीत झालेल्या स्पर्धेत तिने ब्राँझ पदक मिळवताना भारतीयांकडून सर्वाधिक गुणांचा विक्रम साकार केला. सध्या ती राष्ट्रकुल स्पर्धेतील यशासाठी प्रचंड मेहनत घेत असून, या स्पर्धेतील पदक तिला टोकियो ऑलिंपिकसाठी पात्र ठरवणार आहे. दीपा कर्माकर व्हॉल्ट प्रकारात तर मेघना रिदमीक प्रकारात जिम्नॅस्टिकमध्ये भारताच्या आशास्थान बनल्या आहेत. तिने जर ऑलिंपिक पदक मिळवले तर ते भारताचे पहिलेच ऑलिंपिक जिम्नॅस्टिक पदक ठरेल.



## 'आईकडून गिरवले धडे

मेघनाने आपली आई प्रविणा रेड्डी यांच्याकडेच रिदमीक जिम्नॅस्टिकचे प्राथमिक धडे गिरवले. प्रणीता या देखील राष्ट्रीय जिम्नॅस्टिक खेळाडू होत्या त्यामुळे मेघनाला घरातील क्रीडासंस्कृतीचा खुप मोठा लाभ झाला. ती जशी खेळामध्ये दिवसेंदिवस प्रगती करत आहे तशीच शिक्षणातही गांभीर्याने वाटचाल करत आहे. तिचे आई-वडील त्यासाठी तिच्यावर कोणतेही दडपण आणत नाहीत ही मेघनाची सर्वात जमेची बाजु आहे. कारण दहावी आणि बारावीची परीक्षा आली की पालक मुलांचे खेळणे बंद करतात आणि त्यांची पुढे जाण्याची संधी घालवतात. यातूनच चांगले चांगले खेळाडू 'ड्रॉप आऊट'चे शिकार बनतात. एकदा का एखादया खेळाडूचे वर्ष शिक्षणाच्या दडपणामुळे मैदानाबाहेरच वाया गेले तर त्याला पुन्हा ट्रॅकवर यायला खुप वेळ लागतो. पहिल्या पासून पुन्हा सराव करावा लागतो, विविध स्थानिक स्पर्धा खेळाव्या जागतात आणि तोपर्यंत कित्येक स्पर्धक निर्माण झालेले असतात ही चुक मेघनाच्या घरच्यांनी केली नाही आज म्हणूनच तिचे सातत्य कायम राहीले.

## 'आर्थिक मदतीची अपेक्षा

युक्रेनसह ग्रीस वा इतर युरोपीय देशांत सध्या मेघना सरावासाठी तसेच स्पर्धांसाठी जाते. यासाठी खूप खर्च येतो. साधारण दरवर्षी पंचवीस



लाख रुपये इतकी रक्कम तिच्या खेळावर तिच्या कुटुंबीयांनाच खर्च करावी लागते. २०१४ नंतर काही प्रायोजक पुढे आले त्यांनी मदतीचा हात दिला आहे, पण तो पुरेसा नाही. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या टी.ओ.पी. (टार्गेट ऑलिंपीक पोडीअम) योजनेअंतर्गतही तिचा करार यावर्षी संपणार आहे. त्याचे नूतनीकरण होण्याची शक्यता आहे मात्र त्यासाठी तिला राष्ट्रकुल आणि त्यानंतरच्या आशियाई स्पर्धेत पदक मिळवलेच पाहिजे. देशातील प्रशिक्षकांपेक्षा परदेशातील प्रशिक्षकांच्या अकादमीत सराव करण्यामुळे खूप मोठा आर्थिक भार सोसावा लागतो. येत्या काळात तिला खासगी प्रायोजकांबरोबरच केंद्रीय क्रीडा मंत्रालयानेही जर आर्थिक मदत केली तर ती ऑलिंपिकला पदक मिळवू शकेल. त्यासाठी तिचे कुटुंबीय आशावादी आहेत.

## ‘टी. ओ. पी. म्हणजे काय?

केंद्र सरकारच्या क्रीडा मंत्रालयाने टी. ओ. पी. (टार्गेट ऑलिंपिक पोडिअम) ही योजना जाहीर केली. या अंतर्गत देशातील अनेक क्रीडा प्रकारातील अव्वल खेळाडूंना या योजनेत सहभागी करून घेण्यात आले. भारतीय खेळाडू राष्ट्रकुल, आशियाई, आफ्रो-आशियाई, जागतिक विजेतेपद आणि विश्व स्पर्धेत ज्या खेळात सहभागी होतात आणि पदके जिंकतात त्यांना या योजनेत करारबद्ध करण्यात येते. त्यांना आर्थिक मदत पुरवली जाते शिवाय जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधा पुरवल्या जातात. ठरावीक काळात त्यांची कामगिरी पाहिली जाते व त्यांना या योजनेत ठेवायचे की बाहेर काढायचे याबाबत निर्णय घेतला जातो.

सध्या या योजनेत मैदानी स्पर्धेतील एकोणीस, तिरंदाजीत सोळा, बॅडमिंटनमधील सहा, मुष्टियुध्दात आठ, नेमबाजीत आणि कुस्तीत प्रत्येकी सतरा आणि यॉटिंगमध्ये दोन असे खेळाडू जोडले गेले आहेत. त्यात दीपा कर्माकर, मेघना रेड्डी आणि इतरही खेळांतील खेळाडूंच्या नंतर समावेश करण्यात आला आहे. इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपनी व अर्थ मंत्रालयाने या योजनेसाठी तीस कोटी रुपयांचा निधी दिला आहे. दरवर्षी दहा कोटी रुपये खेळाडूंच्या प्रशिक्षणावर खर्च केले जात आहेत. खेळाडूंना स्टायपेंड स्वरूपात जास्तीत जास्त पन्नास हजार रुपयांचा निधी प्रत्येकी दिला जातो. या व्यतिरिक्त भारतीय क्रीडा प्राधिकरणातर्फे काही खेळाडूंना परदेशातही सरावासाठी पाठवले जाते. त्यांना जागतिक पातळीवरच्या प्रशिक्षकांकडे सरावाची संधी यातून मिळते. त्यासाठीही प्राधिकरण निधी देते. तसेच खेळाडूंना काही अद्ययावत साहित्य विकत घेण्यासाठीही आर्थिक सहाय्य दिले जाते. जेणेकरून खेळाडूंच्या सर्व अपेक्षा पूर्ण व्हाव्यात व त्यांनी केवळ खेळावर, सरावावर आणि स्पर्धांवर लक्ष केंद्रित करावे व देशासाठी सरस कामगिरी करावी.

मेघना रेड्डी देखील या योजनेत सहभागी आहे; पण तिला जो खर्च येतो तो सर्व करणे क्रीडा मंत्रालयाला आणि प्राधिकरणाला शक्य नाही म्हणूनच खासगी प्रायोजकांनी पुढे येत मेघनाला मदत केली तर तिचा आत्मविश्वास उंचावेल व ऑलिंपिक पदकाची खात्री निर्माण होईल.

मेघना रेड्डी एकटीच नव्हे तर अशा अनेक खेळाडू आपल्या देशात तयार होत आहेत. ऑलिंपिक खूप पुढचा टप्पा झाला पण टी.ओ.पी. योजनेची व्याप्ती आणखी वाढवून जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचाही या योजनेत विचार केला जावा तरच खरोखर क्रीडा संस्कृती या देशात रूजेल. या योजनेबरोबरच केंद्रीय क्रीडा मंत्रालयाची 'खेलो इंडिया' ही मोहीमही याकामी लाभदायक ठरेल. केवळ २०२०चे टोकियो ऑलिंपिक नव्हे तर २०२४ व २०२८ चे देखील ऑलिंपिक डोळ्यांसमोर ठेवून खेळाडूंना मदत केली पाहिजे व या दोन्ही योजनांची काटेकोर अंमलबजावणी केली पाहिजे तरच देशाला खऱ्या अर्थाने 'ऑलिंपीक विजेते' खेळाडू गवसतील.



# नौदलातील पहिल्या महिला वैमानिक शिवांगी रुजू

**नवी दिल्ली :** नौदलातील पहिल्या महिला वैमानिक लेफ्टनंट शिवांगी दोन डिसेंबरला प्रशिक्षण संपवून सेवेत रुजू झाल्या. नौदल दिन ४ डिसेंबरला असतो, त्या आधी दोन दिवस त्या कोची येथे नौदलात कार्यरत झाल्या.

शिवांगी एझिमला येथील भारतीय नौदल अकादमीत एसएससी (वैमानिक) म्हणून दाखल झाल्या. गेल्या वर्षी जूनमध्ये व्हाइस अडमिरल ए. के. चावला यांनी शिवांगी यांना औपचारिकरीत्या नौदलात रुजू करून घेतले. सध्या नौदलाच्या हवाई विभागात हवाई वाहतूक नियंत्रक पदावर महिला अधिकारी आहेत. तसेच, विमानांच्या तपासनीस म्हणूनही काही अधिकारी नियुक्त आहेत. या महिला अधिकाऱ्यांकडे संपर्क आणि शस्त्रे यांची जबाबदारी असते.



नौदलाच्या दक्षिण कमांडमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या शिवांगी यांना २ डिसेंबरला डॉर्निअर विमाने चालविण्याचा परवाना मिळाला. विमानाच्या कॉकपिटमध्ये बसणाऱ्या शिवांगी या नौदलातील पहिल्या महिला वैमानिक ठरतील. काही वर्षांपूर्वी बिहारमधील एका छोट्या गावात मंत्र्यांची सभा होती. मंत्रिमहोदय हेलिकॉप्टरमधून गावात पोहोचले. कर्णकर्कश्श आवाज करीत खाली येणारे ते हेलिकॉप्टर पाहून आपणही असेच आकाशात उडाले पाहिजे, असे स्फुल्लिंग दहा वर्षांच्या एका बालिकेच्या मनात स्फुरले. ती बालिका म्हणजेच आजच्या लेफ्टनंट शिवांगी.

शिवांगी मूळच्या बिहारमधील मुझफ्फरपूर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. वडील शिक्षक आणि आई गृहिणी अशा अगदी पारंपरिक, चौकटबद्ध कुटुंबातून आलेल्या शिवांगी यांनी नौदलात प्रवेश करण्याआधी समुद्र एकदाच गोव्यात पर्यटनावेळी आल्या असताना पाहिला होता.

सिक्कीम मणिपाल इन्स्टट्यट ऑफ टेक्नॉलॉजीमधून शिवांगी यांनी इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतले. पदवी घेत असतानाही नौदलात जाण्याचे स्वप्न सतत त्या बाळगून होत्या. किंबहुना वय वाढेल, तसे या स्वप्नाचे रूपांतर ध्यासात झाले. त्यांनी भोपाळमधून सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाची (एसएसबी) परीक्षा दिली. परक्षेत त्या उत्तीण झाल्या मात्र जागा कमी असल्यामुळे त्यांना नोकरीसाठी बोलावणे आले नाही. दरम्यान, त्यांनी जयपूरमधील मालवीय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये एम. टेक.साठी प्रवेश घेतला. त्याच दरम्यान, २०१८मध्ये त्यांनी बेंगळुरूमध्ये एसएसबीची परीक्षा पुन्हा दिली. यावेळी मात्र त्यांच्यासाठी नौदलाचे दरवाजे उघडले.

त्यांना एझिमला येथील नौदल प्रशिक्षण अकादमीमध्ये सहा महिन्यांचे प्राथमिक प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी हवाई दल अकादमीमध्ये वैमानिक बनण्याचे प्रशिक्षण घेतले. गेले सहा महिने कोची येथील नेव्हल एअर स्क्वाड्रन ५५०, हिला फ्लाइंग फिश म्हणूनही ओळखतात, तेथे शिवांगी डॉर्निअर विमान उड्डाणाचे प्रशिक्षण घेत आहेत.

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

## कायदेविषयक जनजागृतीसाठी
## महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची पुस्तकमालिका

# 'विधी'-लिखित

भाग २





# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८ 'सुहिता' हेल्पलाइन - ७४७७७२२४२४

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com



// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२-२६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com


प्रति / TO


RNI No. MAHMAR49593


If undelivered, pls return to,
महाराष्ट्र राज्य महिला
आयोग, मुंबई,
गृहनिर्माण भवन म्हाडा
बिल्डिंग, कलानगर,
वांद्रे (पू.),
मुंबई ४०००५१